# प्रकरण दुसरे

## " ओशिल्लक " एक अभ्यास

कथानक

कथानकाशिवाय कोणत्याही कथेची निर्मिती होऊ शकत नाही. प्रत्येक कथेला कथानक असतेच. कथानकात घटना-प्रसंगाची कालक्रमानुसार गुंफण असते. या संदर्भात फॉस्टर म्हणतात, " कथेत घटनांची कालक्रमानुसार नोंद असते. सोमवारनंतर मंगळवार, मृत्युनंतर विनाश इत्यादी. कथानकातही घटनांचेच वर्णन असते. परंतु त्यात घटनांच्या मागील कार्यकारण मीमांसेलाही अधिक महत्व असते,"[१] म्हणजेच कथानकातील प्रसंगाची व्यवस्था ही कालक्रम आणि कार्यकारणभाव या दोन तत्वानुसार होते.

कथानकाचा विचार करताना कथानकांतील प्रसंग, पात्रे, वातावरणनिर्मिती इ. घटकांचा विचार करावा लागतो, घटना-प्रसंगाच्या सहाय्यानेच पात्रांचा विकास होत असतो. या पात्राच्या कृतीउक्तीतूनच कथेचा विकास आणि कथेचा अर्थ समजू लागतो. यामुळेच कथा दर्जेदार, वाचनीय होऊ लागते.

कथानकांत घटना-प्रसंग महत्वाचे असतात. परंतु घटना म्हणजे काय ? आणि तिचे कथात्म कार्य कोणते ? याबाबतीत गंगाधर पाटील म्हणतात, " घटना प्राकृतिक किंवा मानसिक स्वरुपाच्या असतात, मात्र या घटना स्वत:हूनच घडत नाहीत, की त्या आकाशातून पडत नाहीत, कथा-कादंबरीतील व्यक्ती विशिष्ट स्थळी, विशिष्ट काली या घटना घडवीत असतात. या घटनांच्या घडणीतून व्यक्तीही वाढत-घडत जातात.

त्यामुळे घटनांमध्ये त्यांना घडविणाऱ्या पात्रांचे-व्यक्तींचे जीवनहेतू इच्छा, आकांक्षा प्रतिबिंबित झालेल्या असतात. या घटनाप्रवाहामागे निवेदकाचा कथाहेतू, त्याची जीवनदृष्टी असते. निवेदक आपल्या कथाहेतूनुसार व जीवनदृष्टीनुसार घटना प्रवाहाला विशिष्ट प्रकारची दिशा, गती, वळण व वजन देत असतो. आणि निवेदकाच्या या कथाहेतूमागे लेखकाचा व्यापक मूल्यभाव व कलाहेतू अंत:स्थपणे कार्य करत असतो. खरे म्हणजे लेखकच आपल्या कलात्मक गरजेनुसार व मुल्यभावानुसार निवेदक, पात्रे, घटना आदी घटकांना एकात्म, संघटित करीत असतो. थोडक्यात घटनाप्रवाहामागे पात्रांचे हेतू असतात. पात्राच्या हेतूमागे निवेदकाचा कथाहेतू व जीवनदृष्टी असते. आणि निवेदकाच्या हेतूमागे लेखकाचा कलाहेतू व मुल्यभाव असतो"[2] कथेतील घटना वेगवेगळ्या पध्दतीने एकत्रित आलेल्या असतात. आणि त्यातून लेखकाची निवेदकाची, पात्रांची जीवनदृष्टी मुर्त होत असते.

" श्रीशिल्लक " कथासंग्रहातील कथा अनेक घटना-प्रसंगाच्या सहाय्याने अभिव्यक्त होतात. या घटना प्रसंगाच्या माध्यमातून कथाबीज आकाराला येत असते.

" श्रीशिल्लक " या पहिल्याच कथेत, " एका प्रबळ उर्मीने स्वामीला पत्नी अर्पण करणारा शिष्य बावीस वर्षांनी भेटतो," या कथाबीजातून कथा फुलते, या कथाबीजातून कथा फुलतांना कथेत अनेक घटना घडतात, परंतु पहिली आणि महत्वाची घटना म्हणजे सरस्वतीला विश्वेश्वर दिसतो आणि ती दचकते.

कथेची सुरुवात विश्वेश्वराच्या दिसण्याने होते आणि शेवट त्यांच्या अदृश्य होण्याने. मात्र या मधल्या काळात अनेक घटना घडतात. कथा दोन दिवसांच्या काळात घडते, पण कथानकाचा काळ बावीस वर्षांहून जास्त आहे. कथा वर्तमान-भूत-वर्तमान अशा कालक्रमात घडत राहाते, त्यामुळे जाणिवपूर्वक केलेल्या या कालक्रमाच्या मोडतोडीमुळे कथा अर्थपूर्ण होते.

विश्वेश्वर आपल्या भविष्याचा कोणताही विचार न करता आपल्या सर्वात प्रिय अशा पत्नीचं दान स्वामींच्या हातावर सोडतो, धर्माचरणावर असणारा प्रगाढ विश्वास आणि स्वामींबद्दल असणा-या प्रचंड श्रध्देने त्यानं पत्नीचं दान केल्यानंतर तब्बल बावीस वर्षांनी - धर्माचरणातील खोटेपणा आढळून आल्यावर - पत्नीला, सरस्वतीला परत न्यायला तो येतो, या मधल्या काळात त्याने पुजा-अर्चा, संध्या, जप यांना मूठमाती दिली आहे. कुलस्वामिनीला गंगार्पण केली आहे. त्यामुळे त्याचे धार्मिक जीवन आणि नंतर भौतिक जीवनही उध्वस्त होते.

शिष्याने दिलेले दान स्वामी अहंकाराने स्वीकारतात, आणि संन्यासधर्मावर नैसर्गिक वासना विजय मिळवितात. सरस्वती-पासून त्यांना मुलगाही होतो. स्वामीचे नैतिक अध:पतन होते.

तर सरस्वती पतो विश्वेश्वराच्या धार्मिक श्रध्देचा आणि स्वामीच्या नैतिक अध:पतनाचा बळी ठरते. आपल्या प्राक्तानाचा हवाला ती गोपालकृष्णावर सोपविते, वाट्याला आलेले दु:ख मुकपणे सहन करते. या पात्रांच्या वाटयाला आलेल्या दु:खासंदर्भात वा. ल. कुलकर्णी म्हणतात, " जीवनात निर्माण होणा-या प्रबळ उर्मींच्या पुरांत वाहून जाणारा व स्वत:च्या पत्नीचे गुरुदक्षिणा म्हणून

दान करणारा विश्वेश्वर. पतीच्या उर्मीच्या पुरांत मुकाट वाहणारी सरस्वती आणि गुरुदक्षिणा स्वीकारतेवेळी स्वत:च्या अंतर्मनाचा पूर्ण वेध घेऊ न शकणारे स्वामी. यांच्या जाणीवा काळाच्या ओघांत जागृत होतात. आणि त्यातून निर्माण होणा-या दु:खाच्या ताण्याबाण्यांतून " श्रीशिल्लक " ही कथा एक विलक्षण दु:खाचा आकार धारण करते" [3]

कथेच्या सुरुवातीला विश्वेश्वर दिसतो आणि सरस्वतीच्या मनात आठवणींचे मोहोळे निर्माण हो तांत. तिच्या डोळयांत पाणी तरळते तर कथेच्या शेवटी आलेल्या प्रवाहाने ती ओक्साबोक्शी रडते. या दोन प्रसंगात समान्तसुत्र आहे. वर्तमान-भूत-वर्तमान अशा कालक्रमानुसार कथेची वीण घातल्यामुळे कथेला सौंदर्य प्राप्त झाले आहे.

कलावंत मन आणि व्यावहारिक मन अशा दोन मनांच्या प्रवृत्तीतून 'मारवा " या कथेचे कथानक घडते.

कथेची सुरुवात सुखवस्तु असलेल्या नानासाहेबांच्या बंगल्याच्या वास्तुशांतीने होते. आपल्या भावाबहिणींच्या सर्व ऋणातून मुक्त होत असताना गुरुनाथच्या संदर्भात त्यांच्या मनात रुखरुख लागून राहिली आहे.

या वास्तुशांतीच्या वातावरणात वसंतची त्याच्या मेहुण्यांनी केलेली चेष्टा, थट्टामस्करी, ह्याच कॉलनीत आर्किटेक्ट बल्लाळ यांच्यावर आलेली इन्कमटॅक्सची केस, असे अनेक येर कथाकाराने थोड्क्या शब्दांत रंगविले आहेत. परंतु गुरुनाथच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर हे प्रसंग अनाठायी वाटतात.

अशा विविध प्रसंगांनी कथेची सुरुवात होते. परंतु गुरुनाथचे " आगमन " हीच महत्वाची घटना योगायोगाने घडते. या योगायोगामुळेच कथानकाला कलाटणी मिळते.

नानासाहेबांचो जीवनदृष्टी व्यावहारिक तर गुरुनाथची जीवनदृष्टी ही कलावादी आहे. या दोन सत् जीवनदृष्टीचा संघर्ष कथानकात दिसतो. दोघेही मनाने मोठे आहेत. हा मोठेपणा नानासाहेबांच्या संवाद-निवेदनातून तर गुरुनाथच्या कृती-उक्तीतून व इतरांच्या प्रतिक्रियातून दिसून येतो.

या कथेच्या संदर्भात निशिकांत मिरजकरांचे मत पहाण्यासारखे आहे. ' " मारवा" कथेतील श्रमसाफल्य पावलेल्या पण तरोही व्यावहारिकतेच्या चिंचोळया रेषेत सरपटणा-या नानासाहेबांना अनपेक्षितपणे भेटलेला त्यांचा भाऊ गुरुनाथ, सा-या बंगल्यातील तकलादू, कचकडी वातावरणात संगीताच्या सीमेपलीकडचा प्रकाश देतो आणि अभावितपणे जणू त्या पणतीची ज्योत केवढीतरी मोठी घेऊन नानासाहेबांचे अनुभवविश्व अंतर्बाह्य दिपवून टाकते "[४]

संगीत क्षेत्रात गायला जाणारा " मारवा " हा सायंकाळच्यावेळी गायला जातो. आणि तो मनाला सुखद अनुभूती देतो. त्याप्रमाणे गुरुनाथचे आगमन सायंकाळीच होते. त्याच्या आगमनाने एक सुखद, प्रसन्न वातावरण निर्माण होते.

एकुणाच ही कथा दोन सत्शील मनाचा संघर्षच व्यक्त करते. कांही तासातच एका सायंकाळी, रात्रीपर्यंत घडलेली ही कथा

आहे. वर्तमानकाळ - भूतकाळ आणि पुन्हा वर्तमानकाळ अशा प्रकारची कालतत्वाची सांगड कथाकाराने सफाईदारपणे घातलेली आहे.

" या कथांच्या कलात्मकतेत अर्थलयांना फार महत्व आहे. उदा. " मारवा " या कथेत वास्तुशांतीचा समारंभ व त्या संदर्भात नानासाहेब, त्यांची मुले, जावई, इ.चे संवाद इ. अनेक घटना येतात. हे घटक एक बंदिस्त संबंध, व्यवहारी जीवन निर्माण करतात, पुढे येणाऱ्या विरक्त आणि लहरी जीवनांशी हे विरोध साधते. या विरोधी लयीने कथा रेखीव होते" [5]

चिरमुले यांच्या कथांत हा विरोधलयाचा अविष्कार अनेक कथेत दिसतो. उदा. 'बेणं', 'दि मर्मन', 'ट्रॅपीझ', 'एका स्टेशन-मास्तराची गोष्ट', 'अनिकेत' इ.

वर्तमानकाळ - भूतकाल - वर्तमानकाळ अशा कालक्रमात घडणारी सुरेख कथा म्हणजे " बेणं " होय. " राधाआजीला गतजीवनाचे होणारे भास, देशमुखांच्या वाड्याची केविलवाणी वास्तव अवस्था, धाकट्या मालकांचे नवे विचार आणि भावविश्व यांच्या विलक्षण संघर्षातून " बेणं" या कथेत एकमेव अनामिक दु:खाला आकार प्राप्त होतो" [6] हे दु:खाचे विविध स्वरुप या कथांत दिसते.

या कथेतील राधाआजीला पूर्वीच्या राजवैभवाचे भास होतात आणि पुन्हा ती वर्तमानात येते. फ्लॅशबॅक पद्धतीचा उपयोग करुन कथाकाराने विलक्षण गुढ असे दु:ख साकार केले आहे. कथा-रचनेचे वेगळे तंत्र आणि अनुभवाची अपरिचितता यातून कथा सामर्थ्यशील ठरते.

राधाआजीच्या या भ्रमाच्या पार्श्वभूमीवर धाकटे मालक वर्तमानात जगतात. इस्टेट मोडून रोकड करण्यातच त्यांचा वेळ जातो. पण प्रापंचिक कोटीत रहाण्याचे त्यांना जमत नाही. कुलपुरुषाच्या नैवेदयासाठी उधार माल आणला म्हणून राधाआजीवर ते संतापतात. या पार्श्वभूमीवर दत्ताची आरती करणारे धाकटे मालक श्रध्दाळू वाटतात. त्यांच्या वृत्तीतील या संवेदनशिलतेमुळेच राधाआजीच्या " असण्या-नसण्या" तील दरी त्यांना कळते. वर्तमानकाळातील दोन - तीन दिवसांतच ही कथा घडते. परंतु कथानकाचा काळ सत्तर वर्षाइतका आहे. कथेची सुरुवात आणि शेवट राधाआजीला होणा-या भ्रमानेच होते. सुरुवात आणि शेवट यामध्ये सांगड घालण्यात कथाकाराचे कौशल्य याही कथेत दिसते.

राधाआजी आणि धाकटे मालक ज्या अवस्थेत जगतात, त्याचे कारण नियतीच आहे असे वाटते, ही दोन्हीही पात्रे परिस्थितीपुढे हतबल, अगतिक आहेत. ही माणसं त्या त्या ठिकाणी एकाकी आहेत. ही एकाकीपणाची दु:खे " शीशिल्लक" मधील पात्रांच्या ठिकाणी जागोजागी आढळतात.

" ट्रॅपीझ " या कथेमध्ये कुमारवयांतील भावविश्वाचे चित्र महाविद्यालयीन विदयार्थ्यांच्या माध्यमातून व्यक्त होते. या कथेमध्ये उसळणा-या बेचैन तगमगीला अपेक्षित पण अचानक असे हलके वळण मिळते आणि एका भाववेडया मनाची व्याकुलता एकदम उंच टोक गाठते" [७] या कथाबीजातून कथा फुलते. सत्यविनायक व्यंकटेश जोशी हा कथानायक, सर्वसामान्य कॉलेज

विद्यार्थी. कथेतील घटना-प्रसंगातून त्याच्या मनोविश्वाची कल्पना येते. परिक्षा हॅालमध्ये सगळे टाकांची कवायत करतांना जोशीला कॅालेज जीवनातील चार वर्षे आठवतात. त्यांतच तो रममाण होतो. याही कथेत चिरमुलेंनी वर्तमानकाळ आणि भूतकाळ यांच्यात संवाद साधला आहे. जोशीला आठवलेल्या गतस्मृती, परिक्षा हॅालमधील उमाचे पाहणे आणि त्यांने पुन्हा भुतकाळात हरवणे, अशा प्रकारे काळाची मोडतोड करुनही कथेला सौंदर्यता प्राप्त झाली आहे.

जेमतेम दहा ओळी लिहून हॅालमधून बाहेर आलेला जोशी सरळ शिरुत सरांच्या बंगल्यात जातो. पण त्या मन:स्थितीत त्याची सरांच्याबद्दलची नेहमीची भावना बदलते. ही बदलणारी मन:स्थिती " उन्मनी पडदे " सारख्या प्रतिकातून दिसते.

कथेच्या शेवटी लिखितेच्या प्रश्नाने कथानायकाला हुंदका फुटतो. दबलेल्या भावनांना वाट मिळते.

व्यक्ती-प्रधान असलेल्या या कथेत पात्राच्या बदलणा-या भावविश्वाचे चित्र दिसते. जोशीच्या मनातील चढउतार, विविध प्रकारचे ताण आणि त्यातून सुटका होण्यासाठी दिलासा शोधणारे हळवे, भावनाशिल, संवेदनाशील मन कथाकारांने रंगविले आहे.

वरील " श्रीशिल्लक " " मारवा " " बेण" " ट्रॅपीझ" या कथांतून फ्लॅशबॅक पद्धतीचा वापर केलेला असून त्या समर्थपणे अविष्कृत झाल्या आहेत.

" एका स्टेशनमास्तराची गोष्ट " या कथेमध्ये अशा पद्धतीचा वापर केलेला नाही. तर कथानक सरळपणे घडले आहे. घटना जशा घडतात तशा क्रमवार आल्या आहेत. तरीही संथपणे पुढे सरकत रहाणा-या या घटना, वाचकांच्या मनाला स्पर्श करुन जातात.

कथा रात्रीच्या वातावरणाने सुरु होते. एक एकलकोंडे स्टेशन. एक जोडपे चुकून या स्टेशनावर उतरते. आणि त्या स्टेशनाची व स्टेशनमास्तराच्या आयुष्याची ख-या अर्थाने सुरुवात होते.

आजारी असणारा डॉक्टर नवरा, त्याची सुश्रुषा करणारी रसरशीत देहयष्टीची, विपुल केसांचा अंबाडा बांधणारी, चेह-यावर म्लान सहनशीलता असणारी - ' ' पत्नी यांच्या संवादातून त्यांच्या जीवनाचे दर्शन घडते.

आजारी नव-यासाठी लागणा-या गरम पाण्याच्या पिशवीसाठी स्टेशनमास्तराकडे " ती " चौकशी करते. आणि दोघेही त्यांच्या घरी जायला निघतात. औपचारिक संभाषण होते. जाता जाता सहज ती वेळेचा अंदाज विचारते. निरखुन पाहणा-या त्यांच्या ताशीवकपाळाकडे, सणसणीत काळसर मनगटाकडे तिचे लक्ष जाते, ती धुटमळते आणि थिजून रहाते. रस्त्यातून जाताना ती अडखळते, ते एकमेकांचे हात धरुन चालतात

पुढे स्टेशनमास्तराच्या अवघडलेल्या बायकोच्या बाळंतपणात ती मदत करते. बाळबाळंतीण सुखरूप होतात. हलकेपणाच्या जाणीवेनं त्याला रडू कोसळते. सकाळी या जोडप्याला निरोप देताना त्याच्या मनात अस्वस्थ करून सोडणारी कृतज्ञता निर्माण होते.

कथानक मोजक्या प्रसंगाने घडते. परंतु " दोन मनात निर्माण होणारे संयमित आकर्षण" हीच कथानकातील मुख्य घटना आहे. माणसांच्या मनातील मूलभूत प्रेरणा, माणसाच्या मनावर क्षणाकाल सत्ता गाजवितात. आणि लगेच आपले रूपही बदलतात. हा संघर्ष कथाकाराने संयमीत स्वरूपात साकार केला आहे. स्टेशनमास्तरांच्या बायकोचे बाळंतपण " ती " करते आणि त्यांच्या मनात कृतज्ञता भरून रहाते.

या कथेतही बदलणाऱ्या भावनांचा सूक्ष्मपणे वेध घेण्यात कथाकाराला यश आले आहे. यादृष्टीने ही कथा अर्थगर्भ होते. शिवाय या " कथेत असाध्य रोगाने ग्रासलेल्या आपल्या नवऱ्यास एक डॉक्टरीण एका भलत्याच स्टेशनवर उतरून येते आणि आसन्नप्रसव स्त्रीची सुटका करून एका नव्या जीवाला जगांत आणते" ८ हा विरोधलयाचा अविष्कारही या कथेत दिसतो. त्यामुळे कथेला सौदर्यमुल्य प्राप्त झाले आहे.

" अनिकेत " कथेत एका " विधवेवर आलेल्या दु:खाची मालिकाच " दिसते. बालवयातल्या पात्राच्या दृष्टिकोनातून सांगितलेली ही कथा, कथानकांत येणाऱ्या प्रसंगाने हृदयाला चटका लावून जाते.

लहानग्या यशवंताला लवकर झोप येत नाही, आईचे रडणेही थांबत नाही, कारण सखारामाच्या ( पतीच्या) अभावी तिला आधार राहिलेला नाही. याची जाणीव एकनाथकाका व रमाकाकी या पात्रांच्या संवादातून होते. यशवंताला त्यांच्या बालमनामुळे यांतले काही कळत नाही.

एकनाथकाका आणि रमाकाकी, हे दिवस भरून आणारी पाच-सात दिवस झालेल्या सीतावहिनीला सभ्यरोतीने घराबाहेर काढू पाहतात. यशवंताला मात्र मामाच्या गावाला जाण्याच्या जाणिवेन आनंद झालेला आहे. कथाकाराच्या उपरोधपूर्ण शैलीचा विशेष येथे प्रकर्षाने जाणवतो.

एकनाथकाका, यशवंता व सीतावहिनीला अर्ध्या वाटेवर सोडतो, " परत घरी येण्याच्या फंदात पडू नका" अशी सक्तीची सूचना करतो आणि सृष्टीच्या पसाऱ्यात आपण " अनिकेत " आहोत अशी उदास जाणीव सीतेला होते.

नाथाच्या धर्मशाळेत असहाय्य अवस्थेत ती बाळंत होते. रक्ताचा ओघळ पाहून यशवंता घाबरतो. त्याच्या डोक्यात रक्ताचा ओघळ पुसून टाकण्याची कल्पना येते. पाणी आणण्यासाठी गेलेल्या यशवंताला घेऊन, अचानक आलेला पुरुषभर उंचीच्या अक्राळ-विक्राळ लाटा पुढे पुढे सरकत रहातो.

कथेतील घटना-प्रसंग नाटयरूप धारण करतात. विधवा मनाची निराधार अवस्था, नात्यातील माणसांचे स्वार्थी उपरोधिक वर्तन आणि परिस्थितीबरोबर नियतीने दिलेले दुःख समर्थपणे दिसते. " या कथेत यशवंताच्या विधवा निराधार आईचे सूक्ष्मविव्हल दुःख साधपटत घरगळताना त्यातच एकदम परिस्थितीच्या नाटयाचा उच्चबिंदू (climax) उचंबळून येतो. यशवंता पुरात वाहून जातो"[९] एकूण कथेतील कसदार प्रसंग नाटयरूप धारण करतात.

वरील कथांतून माणसाच्या दुःखाचे विविध पदर आपल्याला दिसतात. ही दुःखे नियतीने निर्माण केलेली आहेत असेच कथा वाचतांना जाणवते. या कथासंबंधी प्रदीप नेरूरकर यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, " या सा-या कथांवर त्यातल्या माणसांवर एक कारूण्याची, दुःखाची उदासिनेतेची छाया पडली आहे असे वाटते" [१०]

" आवर्त " या कथेचे कथानक एका पात्राभोवतीच फिरते. या पात्राच्या भावनिकतेचे वेगवेगळे अविष्कार या कथेत दिसतात. मुख्य पात्र असणारी नायिका आपल्या जगून झालेल्या जीवनाचा अलौकिक आणि शारीर पातळीवर अर्थ लावू पाहते.

कथेत वर्तमानात फारसं काही घडतच नाही. परंतु भूतकाळाचा शोध " ती " वर्तमानात घेते - प्रथमपत्नी हयात असणा-या गायक कलावंताच्या आवाजावर भाळून तत्वज्ञानाच्या या सालास विद्यार्थिनीने संसार थाटला. परंतु अलौकिक आनंद देणारा हा गायक लौकिकात वेगळाच विषयासक्त होता. त्याचा दैवी स्वर फुलायला तिच्या शरीराचे पाशवी इंधन

तिला यावे लागायचे आणि अलौकिकाची फुलवण्याची आणि विझविण्याची किमया तिला अनुभवायला यायची.

कथा वर्तमान-भूत-वर्तमान अशा क्रमानेच घडते. वर्तमानात फारसे काही घडतच नाही. तीन मुलांसह संसार ती कसातरी रेटते आहे. त्यांच्या मैफिली अलिशान दिवाणखाण्यात निमंत्रितांच्या उपस्थितीत घडतात. मैफिल संपल्यानंतर मात्र तो शहरातल्या टाकाऊ गल्लीत आसरा शोधत फिरतो.

जीवनातल्या सगळ्या घटनांचा अर्थ ती शोधते, " आला क्षण आपला, गेला क्षण शून्यात विलीन" हे मान्य करूनही त्याक्षणांची तप्तमुद्रा तिच्या मनांत कोरलेली आहे. कशाची कशाला संगती लागत नाही. अस्तित्व अस्तित्वाच्या मोहात सापडतं, अस्तित्व अस्तित्वाशी वैर करतं, असे अनुभव तिच्या अनुभवाला येतात.

संपूर्ण कथानक व्यक्तीप्रधान आहे. एका कलावेडया स्त्री च्या मनाची आवर्तनं कथेत गुंफली आहेत. चिरमुलेंना संगीतविषयक जाण आहे. त्याचा वापर कलात्मकतेने त्यांनी कथेत केला आहे. त्यामुळे कलावंताच्या अंतर्मनाचा शोध ते सूक्ष्मरीतीने घेऊ पहातात. आणि कलंदर गायकाच्या पत्नीच्या व्यथा समर्थपणे रंगवतात शांता ज. शेळके यांनी मांडलेले मत, " आवर्त " या कथेमध्ये कलावंताची अलौकिक दैवी कला फुलविण्यासाठी पाशवी दैहिक वासनाचे इंधन, खतपाणी त्याला आवश्यक असतेच का ? असा

अत्यंत मुलगामी प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. चिरमुले यांच्या या कथा, संगीताशी निगडीत असल्यातरी एकुणाच सर्व कलांच्या मुळाशी असलेल्या कांही सामान्य वास्तवाचा त्या शोध घेऊ पहातात, वेगवेगळया कलांच्या मुळाशी असलेल्या कांही सामान्य वास्तवाचा त्या शोध घेऊ पाहतात. वेगवेगळया कलांशी मुळाशी असलेल्या काही सनातन नात्यांकडे त्या आपले लक्ष वेधून घेतात. हे त्यांचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. त्यामुळे मराठीतल्या संगीतविषयक कथांमध्ये त्या आपल्या वेगळे-पणामुळे लक्षणीय ठरतात" [११] चिरमुल्यांच्या कथांविषयीचे हे मत सार्थ वाटते.

गायक कलावंताच्या पत्नीच्या मनात निर्माण होणा-या आवर्तनाची भावव्यथा, कला व जीवन ( लौकिक-अलौकिक ) यांच्या संघर्षातून वाचकांपर्यंत येते.

" आवर्त " कथेत एका नायिकेच्या दु:खाचे चित्र आपल्या-समोर येते तर " दु:ख या कथेत एका विधुराचे दु:ख आपणासमोर येते. पत्नीच्या मृत्यूला आपणाच कारणीभूत आहोत याची खंत त्याला वाटते. हे दु:खच सर्व कनाथकांत दिसते. कथेच्या शेवटी नायकाची विवाहापूर्वीची प्रेयसी तारा भेटते आणि पूर्वीची तटस्थता कायम ठेवून सांत्वन करते.

कथेतील पात्राची मानसिक दुर्बलता कथाकाराने घटनेच्या सहाय्याने रंगविली आहे.

"श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील जवळ जवळ सर्व कथा, व्यथांचा मागोवा घेताना दिसतात ही दु:खे कधी परिस्थिती कधी स्वत: व्यक्तीचे मन तर कधी नियतीमुळे निर्माण होते.

" दि मर्मन " कथेत 'दोन जीवनविषयक दृष्टिकोनांतील विचारांचा संघर्ष ' या कथाबीजातून कथा फुलते. या संघर्षावर नियतीचा प्रभाव पडतो.

भाईजी आणि सुदक्षणा हे एक सुखी दांपत्य. परंतु दोघांच्याही जीवनाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनात काळाच्या ओघांत बदल घडलेला आहे. म्युझिक सेंटरमध्ये गेल्यानंतर सतारियाच्या वादनांत सुदक्षणा रंगून जाते तर भाईजींना, 'मख्खपणे बसलेल्या श्रोत्यांसमोर भिंतीवर टकरा दयाव्यात त्याप्रमाणे सतारिया घामाने निथळून जाईपर्यंत आपल्या कारागिरीची व्यर्थ कोशिश करीत होता' असेच वाटते.

सतारियाचा कार्यक्रम आटोपून " चिल्ड्रेन्स होम " मधील कार्यक्रम उभयतांनी पार पाडला. त्या कार्यक्रमातील " ती " मुले पाहून सुदक्षणेचे काळीज फाटून जाते. ती हळवी होते, रडते. तर भाईजी, हे सारं समाजात चाललं पाहिले" अशा दृष्टिकोनातून या घटनेकडे पाहतात.

प्रत्येक प्रसंगातून दोन भिन्न दृष्टीकोन जाणवतात. सुदक्षणा जीवनाकडे समरसतेने पहाते तर भाईजी तटस्थपणे पहातात. " दि मर्मन " कथेतील भाईजी असेच अगदी तुटकपणे, खंडितपणे पण तरीही निश्चितपणे वर जात जात झेपावणारे त्यांचे व्यक्तिमत्व सुदक्षणेच्या वास्तव सांद्रतेत विरघळण्याचा प्रयत्न

करूनही अलिप्तस्वाधीन राहते. म्हणूनच धारदारपणे स्वत:ची जाणीव देत राहते. आणि अखेरीच्या नि:स्तब्ध निरामयतेच्या लाटांवर त्यांच्या भावनिर्भरतेचा चंद्र अनिश्चितपणे हेलकावत राहतो" [१२]

सुदक्षणेला जीवनाबद्दल आसक्ती आहे तर भाईजींना विरक्तीची जाणीव होते. म्हणूनच डेहराडूनला बंगला बांधण्याचे स्वप्न सुदक्षणेचे तर गावाकडची ओढ भाईजींना. म्हणून आयुष्यात उत्तम नावलौकिक, यश मिळवून सुद्धा त्यांना स्वत:तला खराखुरा"मी" उपरा राहिल्याचा जाणवतो.

कथेच्या अखेरीस कथानकाला कलाटणी मिळते. उत्तम अधिकारी म्हणून नावलौकिक यश मिळविणारे भाईजी विरक्त होत जातात आणि जीवनाबद्दलची आसक्ती, महत्वकांक्षा बाळगणारी सुदक्षणा मृत्यू पावते. अशा सूक्ष्म विरोधलयातून कथानक नाटयरूप धारण करते. सुदक्षणेच्या अचानक मृत्यूने कथेला परिणामकारकता लाभली आहे.

" श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील कथांवर दु:खाची नियतीची छाप जाणवते हे वरील कथेच्या कथानकाचा अभ्यास करतांना जाणवते. वा. ल. कुलकर्णी यांचे या कथांच्या संदर्भात अभिप्राय लक्षात घेण्यासारखा आहे. " माणसाचे मन, त्या मनाचे व्यापार आणि माणसाचे व्यवहार हा तर चिरमुले यांच्या चिंतनाचा सततचा विषय आहेच, परंतु जीवन म्हणजे एवढेच नव्हे, माणसाला चकविणारी, त्याला सतत गोंधळून सोडणारी नियती हा जीवनाचा एक महत्वाचा घटक आहे. ह्याची गंभीर जाणीव त्यांच्या जवळजवळ सर्वच कथालेखनामधून डोकावत आहे. ही जाणीव चिरमुले यांच्या कथेला एक नवे अर्थपूर्ण शोकात्म (tragic)

परिणाम देते" [१३] म्हणूनच चिरमुले यांच्या या कथेतील कथानक वाचकांस अस्वस्थ करून सोडते आणि कथा गंभीर शोकांकिता व्यक्त करते. यांतच त्यांच्या कथांचे श्रेष्ठत्व दिसून येते.

" पाईक " कथेत पक्षापक्षातील वैमनस्य आणि त्यांचे अपरिहार्य परिणाम माणसांला विनाकारण भोगावे लागतात" या कथाबीजातून कथा कथारूप धारण करते.

पहिला संत्री आणि त्यांची प्रेयसी यांच्या असफल प्रेमाची कहाणी, घटनांच्या सहाय्याने साकार झाली आहे. येत्या उन्हाळयात " तिच्याशी " तो लग्न करणार होता. गावातील एका पक्षाच्या स्त्रीशाखेची प्रमुख असणा-या " तिच्यावर " तहशिलाच्या क्रांतीकारी प्रमुखाचा डोळा होता. पण ती बधली नाही. म्हणून छळ करुन तिला ठार मारण्यात आले होते. तिचे अंत्यसंस्कार पाईकाने स्वत:च्या मळीच्या हद्दीवर केले होते.

एका भावनाशील अगतिक नायकाचे दु:ख या कथेत दिसते. वेगळया वातावरणात घडणारे हे कथानक हृदयाला स्पर्शून जाते. या कथेचा शेवट नाटयात्म ( काही वेळा कृत्रिम ) वाटतो. परंतु कथानकांतील प्रसंग आणि वातावरण निर्मितीचे कौशल्य वैशिष्टपूर्ण वाटते.

" युधिष्ठिराचा रथ " या कथेचे कथानक, संस्थानी वातावरण आणि त्यातील व्यक्ती यांच्या जीवनाचे उकल सुरु पहाणारे" आहे. संस्थानातील कारस्थाने, विषय-वासना यांच्या पार्श्वभूमीवर धाकटे सरकार आणि बिरदी यांच्या जन्माची रहस्ये कथानकात साकार होतात. " बिरदीला कर्नाटकात पाठवायचा केलेला बनाव आणि त्यातूनच बिरदी व धाकटे सरकार यांच्या जन्मासंबंधीची बाहेर पडलेली गुपिते हा या कथेचा विषय आहे" [१४]

दिवाणपुत्र बिरदी आणि राजपुत्र धाकटे सरकार उर्फ दिलीप यांचा लहानपणापासून एकमेकांवर फार लोभ. परंतु दिवाणसाहेब आणि सरकारस्वारी मिळून बिरदीला कर्नाटकातील जहागिरीवर पाठविण्याचा कट करतात. तशा स्वरुपाच्या पत्रावर, पत्र पाहिल्याची सही धाकट्या सरकारकडून दिवाणसाहेब घेतात. आणि बिरदी नाईलाजाने कर्नाटकातील जहागिरीवर रवाना होतो.

राजकारणांतील डावपेच, " आम्ही कोण कुणाचा लागतो ? हा धाकट्या सरकारांचा प्रश्न, दिवाणसाहेबांचे बिरदीला स्वतः पासूनचे दूर ठेवण्याचे कारस्थान, सरकारस्वारींची आपल्या पत्नीबद्दलची शंका या सगळ्या घटनाप्रसंगातून संस्थानी वातावरणातील " कारस्थान कारस्थानांना भेटतात, वासना वासनांना " हा प्रत्यय येतो.

बिरदीजवळ राजपुत्राचे गुण व राजपुत्राजवळ साधुत्वाचे गुण, सरकारस्वारींना बिरदीबद्दल जिव्हाळा आणि दिवाणसाहेबांना धाकट्या सरकारांबद्दल सकारण ओढ, अशा स्वभाव -

वैशिष्टयांनी कथेमध्ये एकमेकांची जन्मरहस्ये उलगडतात.

माणसां-माणसांमधील नातेसंबंध आणि त्यातला व्यवहार याचाच अर्थ ही कथा शोधते. आणि त्यातली गंभीरता वाचकासमोर उभी रहाते. त्यांची ( चिरमुल्यांची ) कथा ही मुळत: विचारगर्भ आहे. माणसांच्या व्यवहाराचा अर्थ शोधणे हा तिचा स्वभाव आहे त्यांनी कोणतीही कथा लिहिली तरी त्यात हा तिचा स्वभाव डोकावल्याशिवाय रहात नाही. ती प्रकृतीने जात्याच गंभीर आहे." [१५]

" श्री शिल्लक " कथासंग्रहातील कथांची शीर्षके पाहिली तर, ही शीर्षके चिरमुले यांचा कथेचा महत्वाचा विशेष ठरावित अशी आहेत. या कथासंग्रहात विशेषत: जुन्या संस्काराचा प्रभाव असल्याचे जाणवते. उदा. या कथासंग्रहातील " श्री शिल्लक" " मारवा" " आवर्त " " युधिष्ठिराचा रथ " इ. कथाशीर्षके.

" श्री शिल्लक " कथासंग्रहातील काही कथांची शीर्षके ही कथेला अनुरूप अशा प्रतिमाच आहेत. " ट्रॅपीझ " कथेतील कथा नायक जोशीच्या मनांत निर्माण झालेला ट्रॅपीझ हा " ट्रॅपीझ " या कथाशीर्षकातून प्रतिकात्मक रीतीने व्यक्त होतो. " धागे " या कथेत प्रेमळ पती-पत्नीमधील भावबंधाचे चित्रण आपल्या डोळयासमोर उभे रहाते. त्यांच्यामध्ये असणारी भांडणे, रूसवा फुगवा घरूनही तितक्याच एका साध्या क्षुल्लक कारणांनी आंतरिक ओढीने एकमेकांकडे ओढलेले दोन जीव आपणास दिसतात. त्यांच्यात असणा-या या प्रेमाचे प्रतिकात्मक रुप म्हणजे " धागे " हे शीर्षक होय. तर " बेणं " या कथेतील भूत-वर्तमानात हेलपाटे

घालणारी राधाआजी आणि जमीन विकून रोकड करणारा तिचा नातू हा " वेणं " या प्रतिकातून आपल्यासमोर येतो.

" मारवा " हे शीर्षक " गुरुनाथवर " केलेले रुपकात्म शीर्षक ठरते. संगीत क्षेत्रात संध्याकाळच्या वेळी गायला जाणारा मारवा सुखद, प्रसन्न अनुभूती देतो. त्याप्रमाणे या कथेतील गुरुनाथही संध्याकाळच्या वेळी येऊन सुखद, प्रसन्न अनुभूती देतो. अशाचप्रकारची " युधिष्ठिराचा रथ " ( धाकटे सरकार व बिरदी ), " दि मर्मन " ( भाईजी ) ही रुपकात्मक शीर्षके आहेत.

अशी कांही रुपकात्मक शीर्षके या कथासंग्रहात दिसतात. तशी काही कथांची शीर्षके ही सरळ-साधी आहेत. उदा. " पाईक " " दुःख" " एकेकीची अखेर' इ.

" पाईक " या कथाशीर्षकातून एका शिपायाच्या जीवनातील असहाय स्थिती लक्षात येते, घडणार घटीत बघून त्यावर अगतिक प्रतिक्रिया व्यक्त करण्यापलीकडं " तो " काहीच करु शकत नाही. पक्षाच्या हुकूमाचा " पाईक " होणंच त्याच्या हातात राहातं.

" दुःख " हे कथाशीर्षक असेच साधेसरळ आहे. विधुर कथानायकाच्या मनातील दुःख या कथाशीर्षकातून व्यक्त होते

" युधिष्ठिराचा रथ " या कथाशीर्षकाला महाभारतातील प्रसंगाची पार्श्वभूमी आहे. धाकटे सरकार उर्फ दिलीपला एका विशिष्ट क्षणी धाकटया सरकारांच्या पत्रावरती सही करुन स्वत: सहित बिरदीचीही फसवणूक करावी लागते.

" श्रीशिल्लक " हे कथासंग्रहाचे आणि कथेचे शीर्षक अधिक अर्थगर्भ आहे. व्यवहारातील जमाखर्चाची आजच्या दिवसासाठी मागील पानांवरील बाकी म्हणजे " श्रीशिल्लक." म्हणजेच आजची आरंभीची शिल्लक. या पार्श्वभूमीवर भूतकाळात जमा झालेल्या आयुष्याची बाकी वर्तमानकाळासाठी अशाच प्रकारचा आशय " श्रीशिल्लक " या कथाशीर्षकातून अर्थवाही होतो.

कांही कथांची शीर्षके ही इंग्रजी आहेत उदा. " ट्रॅपीझ" " बॅंकर-ट्रेडर - मॅनेजर, " दि मर्मन " इ.

अशाप्रकारे " श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील शीर्षके ही जुनी तशी आधुनिक, प्रतिकात्मक तशी सरळ साधी अशीही आहेत. एकुणाच कथेचा आशय शीर्षकातून प्रवाहीपणे अर्थगर्भ होतांना दिसतो.

पात्रस्वरुप

कथेमध्ये व्यक्ती चित्रणाला खूपच महत्व असते. कारण कथेचा विकास व्यक्ती-कृतीच्या माध्यमातून होत असतो. ही पात्रेच कथेतून व्यक्त होणारा आशय अधिक स्पष्ट करीत असतात. लेखकाच्या अनुभवविश्वातून आलेली ही पात्रे कथेची संपन्नता वाढवित असतात. चिरमुलेंच्या " श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील पात्रे त्यांच्या व्यापक अनुभवविश्वातून आलेली आहेत. त्यामुळे या कथांना एक व्यापक परिणामकारकता प्राप्त झाली आहे. ही पात्रे वेगवेगळ्या वयोगटातील वेगवेगळ्या पातळीप्रवृत्तीतून आलेली आहेत.

" श्रीशिल्लक " मधील पात्रांचा अभ्यास करतांना ही पात्रे दु:खाचे कडूघोट घेत जगणारी आहेत, तशी कलंदरही आहेत. चिरपरिचितापेक्षा वेगळी, असाधारण अशी आहेत. आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छाआकांक्षा तशाच ठेवून अटळ वेदनेची कळ सोसणाऱ्या व्यक्तिरेखाही या कथासंग्रहात आढळतात. त्याचप्रमाणे निरंजनवृत्तीच्या अलिप्तता धारण करणाऱ्या व्यक्तिरेखाही व्यापक जाणिवेने आपल्यासमोर येतात.

परंतु " श्रीशिल्लक " कथासंग्रहातील जवळजवळ सर्वच पात्रांवर कमी अधिक प्रमाणात नियतीचाच प्रभाव जाणवतो. नियती, परिस्थितीच्या प्रभावापुढे ही पात्रे हतबल झालेली आहेत. "श्रीशिल्लक" या कथेतील विश्वेश्वर, सरस्वती, आणि स्वामी या प्रमुख तिनही पात्रांवर नियतीचीच छाप जाणवते.

गुळप्रेमापोटीच्या उर्मीनं पत्नीचं दानं करणारा विश्वेश्वर या कथेत भेटतो आणि तब्बल बावीस वर्षांनी तो पुन्हा पत्नीला परत नेण्यासाठी येतो. तोपर्यंत त्याने सर्व कर्मकांडाला, पूजाविधीला मूठमाती दिली आहे. आणि जुगार, हॉटेल सारखी ब्राम्हणेतरांची कामेही तो करतो. सरस्वतीच्या दृष्टीनं हे सगळं अगोचर होतं. विश्वेश्वराच्या हातून या गोष्टी घडतात त्याला नियतीच जबाबदार असल्याचं जाणवंत. तर सरस्वती ही विश्वेश्वर आणि स्वामी यांच्या कृती-उक्तीपुढं सर्वस्वी अबोल आहे. जे वाटयाला येते ते स्वीकारत ती प्राक्तनाला दोष देते.

या कथेतील स्वामी, 'या जगात कुणी कुणाचा गुरु होऊ शकत नाही बाबा' हे सत्य विश्वेश्वराला सांगताना स्वतः-च्या वर्तनाची विसंगती ईश्वराकडे सोपवतात.

'श्रीशिल्लक' या कथेतील या तिनही व्यक्तीरेखा नियतीपुढे हतबल ठरलेल्या आहेत. जणूकांही ही पात्रे स्वतःच असं काही ठरवू शकत नाहीत. त्यांना वर्तन करायला लावते ती नियती. या कथेतील पात्रांविषयी वा. ल. कुलकर्णी म्हणतात, " आपल्या पत्नीच्या दानाचं उदक स्वामीच्या हातावर सोडणारा " श्रीशिल्लक " मधील विश्वेश्वर हा जितका लोकविलक्षण आहे, तितकाच तो स्वतः, त्याची बायको सरस्वती आणि तिला आश्रय देणारे स्वामी यांच्या जीवनात निर्माण झालेली घटनात्मक आणि भावनात्मक गुंतागुंतही लोकविलक्षणच आहे" [१६] या घटनात्मक आणि भावनात्मक गुंतागुंतीतून निर्माण होणाऱ्या दुःखाला विशिष्ट कारण नाही. परिस्थितीपुढे ही तिनही पात्रे

नमलेली दिसतात.

" युधिष्ठिराचा रथ " या कथेतील धाकटे सरकार आणि बिरदी ही दोन प्रमुख पात्रे लहानपणीच मातृप्रेमाला पारखी झालेली आणि यातूनच त्यांच्या वर्तनाची क्षितीजे ठरत जातात. या दोन पात्रांच्या वर्तनातूनच ही कथा आकार घेते. दिवाणपुत्राच्या अंगी राजपुत्राचे गुण आहेत. आणि राजपुत्र धाकटे सरकार उर्फ दिलीप यांच्या अंगी साधुत्वाचे गुण आहेत. यातून निर्माण झालेल्या संयमी प्रश्नाला उत्तर म्हणून बिरदीला कर्नाटकात पाठवण्याचा बेत होतो आणि बिरदी उद्विग्न होतो.

सरकारस्वारी आणि दिवाणसाहेब यांच्या समोरचे अपरिहार्य प्रश्न आणि धाकटे सरकार व बिरदी या दोघांमधील मानसिक परिवर्तन यातूनच ही कथा कालक्रमाने घडते. आईच्या प्रेमाला पारख्या झालेल्या आणि वडिलांच्या कोरडा सहवास असणाऱ्या या दोनही पात्रांवरती नियतीचा प्रभाव आणि यातून निर्माण झालेले दु:ख प्रत्ययास येते. यासंदर्भात " युधिष्ठिरांचा रथ " मधील धाकटे सरकार आणि बिरदी, अंत:करण उद्विग्न करणारी भग्नता आणि बेचैनी त्यांच्या जवळ आहे. तिचे रूप मात्र दिशागम्य नाही. दिशाहीनपणे ती कुठेही भरकटते आणि राजकारणातील भपकेबाज, दिखाऊ हिडीस-

पणाला अनेक ठिकाणी छेदून जाते" [१७] हे निशिकांत मिरजकरांचे मत अधिक योग्य वाटते.

चिरमुल्यांनी आजूबाजूला असलेल्या कॉलेजकुमारांच्या प्रातिनिधीक मनोविश्वाचे चित्रण, सत्यविनायक व्यंकटेश जोशीच्या प्रतिमेतून केले आहे. " ट्रॅपीझ " या कथेतील नायक जोशीची बदलत जाणारी भावावस्था आपल्याला या कथेत दिसते. परीक्षा हॅालमध्ये तो असतो तेव्हा त्याच्या मन:चक्षूसमोर भूत-भविष्य सारखे फेर धरून नाचते. त्याच अवधित तो दिवास्वप्नही पाहातो आणि उदास मन:स्थितीत परीक्षा हॅालमधून बाहेर पडतो.

जोशी शितूत सरांच्या घरी, दिलासा मिळेल या हेतूने जातो पण तिथेही त्याचा विरस होतो. कालव्याच्या पुलाशी आल्यावर लिखितेच्या प्रश्नावर तो केविलवाणा होतो आणि मग मात्र जोशीला एकदम हुंदका फुटतो.

संपूर्ण कथा जोशीच्या स्वभावचित्रणावर उभी रहाते. घरची हालाखीची परिस्थिती आणि दुबळी मनोवस्था यामुळे जोशीची कहाणी करुणतेकडेच वळणारी आहे.

" श्रीशिल्लक " कथासंग्रहातील पात्रे ही वेगवेगळया वातावरणातून विविध संस्कार घेऊन आलेली आहेत. ती अशिक्षित आहेत तशीच सुशिक्षितही आहेत. " दि मर्मन " कथेतील सर्वच पात्रे ही सुविद्य, सुशिक्षीत आहेत. प्रत्येकाची जीवननिष्ठाही

ठरलेलो आहे. आयुष्यात प्रामाणिकपणे नोकरी करणारे भाईजी, यश आणि पैसा मिळविणारे भाईजी. परंतु त्यांच्यामला खरा " मी " उपरा राहिल्याचा सल त्यांच्या मनात रहातो. आणि खेड्याची, गावची ओढ त्यांना अधिक भावते. " दि मर्मन" कथेतील भाईजी असेच अगदी तुटकपणे पण तरीही निश्चितपणे घर जात झेपावणारे त्यांचे व्यक्तीमत्व सुदक्षणेच्या वास्तव संदर्भात विरघळण्याचा प्रयत्न करूनही अलिप्त रहाते. आणि अखेरीच्या निःस्तब्ध निरामयतेच्या लाटावर त्यांच्या भावनिर्भरतेचा चंद्र अनिश्चितपणे हेलकावत राहतो"[१८]

तर सुदक्षणा ही अधिक संवेदनाशील, आधुनिक संस्कार घेऊन वावरणारी, समाजातील विद्रुपता, कुरूपता पाहून रडणारी आणि लगेच कलेच्या विश्वातही हरवून जाणारी अशी आहे. त्याचबरोबर तिचा मुलगा अजित हाही काव्यविश्वात रमणारा परंतु नेव्हीत भरती होण्याचं स्वप्न बाळगणारा आहे. येथे स्वभावातील विरोधलयाचा अविष्कार दिसून येतो. या कथेतील आणि इतर कथांतील पात्रांसंदर्भात विजया राजाध्यक्ष म्हणतात; " त्यांच्या ( चिरमुलेंच्या ) कथातील व्यक्ती सुबुद्ध व संवेदनाक्षम असतात. त्यांची एक विशिष्ट "जीवननिष्ठा" असते आणि तिला स्मरून ते आपले जीवन जगत असतात"[१९] परंतु

हे जीवन जगताना नियती त्यांचे इप्सित साध्य होऊ देत नाही. अंदमानातल्या लोकल डायलेक्टसचा अभ्यास करु इच्छिणाऱ्या सुदक्षणेचा कॉन्फरसमध्ये पेपर वाचताना मृत्यू होतो आणि भाईजीचे भावविश्व हादरते. " कधी या आयुष्यात हरल्याचा सल, कधी स्वत:च्या लौकिकदृष्टया यशस्वी जीवनात खराखुरा " मी " उपरा राहिल्याचा सल चिरमुले नेमकेपणाने हेरतात, " श्रीशिल्लक " किंवा " दि मर्मन" या कथा यामुळेच अतिशय ताकदवान झाल्या आहेत" [२०] असा अभिप्राय " श्रीशिल्लक " व " दि मर्मन " कथांच्या संदर्भात विजया राजाध्यक्ष मांडतात.

" अनिकेत " कथेतील लहानग्या मुलाचे मनोविश्व यशवंता या पात्राच्या माध्यमातून व्यक्त होते. नुकतीच विधवा झालेली आई, काका-काकी, यांच्यात झालेला संवाद त्याला कळत नाही. तसे आपली आई का रडते हे ही त्याला उमगत नाही स्वत:च्या मनोविश्वात तो दंग आहे. गावाला जाण्याच्या बोलण्याने तो सुखावतो.

सीतेला माहेरी पाठवणीचा काका, काकीचा हेतू वरुन सरळ दिसतो मात्र 'परत घरी येण्याच्या फंदात पडू नका,' या एकनाथकाकाच्या वाक्याने सीतेला स्वत:ची अनिकेत अवस्था कळून येते. तिच्या " अवघंडल्या" अवस्थेपासून ते यशवंताच्या वाहून जाण्यापर्यंतचे चित्रण, चित्रपटाप्रमाणे आपल्या डोळयासमोर उभे रहाते.

यशवंता आणि सीतेच्या वाट्याला आलेले दु:ख हे माणसाबरोबर नियतीने दिलेले दु:ख आहे. कथेच्या शेवटी तर यशवंताही दुरावतो आणि सीता सर्वस्वी एकाकी होते.

नियतीपुढे हतबल झालेल्या या व्यक्तिरेखा आपल्याला ' श्रीशिल्लक ' मध्ये दिसतात. त्यांच्यावर नियतीचीच छाप अधिक जाणवते. वा. ल. कुलकर्णी म्हणतात, ' या कथा-संग्रहातील पात्रे आपल्या आणि आपल्या भोवतालच्या परिस्थितीची कारणमीमांसा करु शकत नाहीत. ती सामान्य अशिक्षित माणसे आहेत, परंतु ती सुशिक्षित व सुविद्य नसती तरी नियतीनेच झपाटलेली माणसे आहेत. चिरमुल्यांच्या कथांमधील ह्या सुविद्य आणि अशिक्षित पात्रांच्या जीवनकथेचा विचार करु लागलो की डोळ्यांपूढे प्राधान्याने येतात ते एका अव्यक्त भाव-शून्य नियतीचे खेळ"[२१]

" श्रीशिल्लक " मधील पात्रांवर नियतीची छाप जाणवते तशा या सर्वच कथा, व्यथा व्यक्त करणाऱ्या वाटतात. या व्यथा, नियतीमुळे, परिस्थितीमुळे तर कधी मन:स्थितीमुळे निर्माण होतात. या कथांना दु:खाचीच किनार अधिक जाणवते. ' धागे" ही कथा वगळता ही पात्रे कमी अधिक प्रमाणात दु:खीच आढळतात. या दु:खाला कधी लौकिक तर कधी अलौकिक कारणं आहेत. या दु:खाने ही पात्रे उध्वस्त होत नाहीत, त्रागा करीत नाहीत. दु:ख सहन करुन करुन ही पात्रे सोशीक बनतात. उदा. " दु:ख " " आवर्त " " पार्क " मधील पात्रे.

" दु:ख " कथेतील नायकाची मन:स्थिती पत्नीच्या मृत्यूने अस्थीर झालेली आहे. पत्नीच्या मृत्यूला आपणाच कारणीभूत आहोत याची त्याला खंत वाटते. आणि तो स्वत:ला शिक्षा देत रहातो.

अशा अवस्थेत त्याची एकेकाळची प्रेयसी तारा त्याला भेटते आणि तो आपलं दु:ख तिला सांगतो. तारा पूर्वी च्याच अलिप्तपणाने त्याची सर्व कहाणी ऐकते. आणि पुन्हा लग्न करण्याचा सल्ला देते.

नायकाची मनाची व्यथा, आणि आधार शोधण्याची धडपड, अशा स्वभावचित्रणातून नायकाची व्यक्तिरेखा आकार धारण करते. त्यांच्या आईचे पात्रही नकळत रसिकाच्या मनाचा वेध घेते. कारण सुनेच्या मृत्यूच्या दु:खापेक्षा पुत्राच्या स्थितीमुळेच ती अस्वस्थ आहे. तिच्या दु:खाची छाया कथेत गुंफून राहते.

" आवर्त " मधील " ती " चे दु:ख अधिक ठाशीव स्वरुपात वाचकांच्या मनाचा ठाव घेते. या कथेतील " ती " नायकाची पत्नी पण लौकिक -अलौकिकाच्या पाठशिवणीच्या द्वंद्वामध्ये उध्वस्त झालेली आहे.

तत्वज्ञानाची सरळ सालस मुलगी, सरळ सरळ वाया गेलेली म्हणून तिच्याबद्दल सुरुवातीला कुजबुज होते. आणि विवाहीत

असलेल्या गायकाशीच तो प्रेमविवाह करते. पण तिला त्याच्या देहातील अलौकिक फुलवायला आपल्या शरीरांच पाशावी इंधन दयाव लागतं. " अलौकिक अलौकिकाला फुलवत, अलौकिकवं अलौकिकाला विझवतं, अशी अवस्था तिच्या अनुभवाला येते. आणि ती आतल्या आत उद्ध्वस्त होत राहते.

वर्तमानात साऱ्या कुटुंबाचा भार तीच वाहते. तो गातो ते फक्त आलिशान दिवाणखान्यात. ( पण फिरतांना त्याची नजर शहराच्या गलिच्छ वस्तीतल्या गल्लीवर ) आणि इकडे ही मुलांच्यासमवेत राहते. भूत-वर्तमान योच्या आवर्तात ती गुरुफटून गेली आहे. संपूर्ण कथेत कला व जीवन यांच्यासोबत तिच्या मनाची उकल होत राहते. जगण्याचा अर्थ शोधू पाहते.

जीवनात येणाऱ्या प्रसंगामुळे पराधिन झालेला नायक " पाईक " कथेत भेटतो. त्याच्या दु:खातून कहाणीतून त्याचे व्यक्तिमत्व आकार घेते. दोन संत्र्यापैकी हा पहिला संत्री, पाईक म्हणून काम करणारा. येत्या उन्हाळयात " तिच्याशी" त्याला विवाह करावयाचा होता. स्त्रीशाखेची प्रमुख असणाऱ्या या नायिकेवर, तहशिलाच्या क्रांतीकारी समितीच्या प्रमुखाचा डोळा होता. परंतु तिचा नकार. म्हणून या प्रमुखाने तिचा छळ केला आणि शेवटी तिला गोळया घातल्या तिच्या " त्या" स्मारकाच्या ठिकाणी पहिल्या संत्र्यांने दुसऱ्या संत्र्याला आपली कहाणी सांगितली. इथे त्याचे संवेदनशिल परंतु संयमी

मनाचा साक्षात्कार होतो.

कथेच्या शेवटी तो अन्यायी नाराधम आता पक्षप्रमुख म्हणून त्याच्या समोरून, न फुटणाऱ्या काचेच्या गाडीतून निघून जातो, तेव्हा पहिला मंत्री असहाय्यतेने कपाळावर हात मारून घेतो.

एका हतबल प्रियकराचे दु:ख आणि या दु:खातून व्यक्त होणारे भावनाशील व्यक्तीत्व या कथेत दिसते. पाईक आणि राजकीय पुढारी यांच्या वृत्तीप्रवृत्तीचे विश्वच या पात्रांच्या माध्यमातून व्यक्त होते.

नियती एखादया व्यक्तीच्या आयुष्याची परवड अगदी मृत्यूपर्यंत कशी करते याचं सुंदर उदाहरण म्हणून " एकेकाची अखेर" या कथेचा उल्लेख करावा लागेल.

निवेदकाची आई दुर्गाताई आणि चंद्राक्का ही या कथेतील प्रमुख पात्रं.पण चंद्राक्काचं हे एकच पात्र या कथेला परिणामकारकता प्राप्त करून देते. अडीअडचणीच्या काळात मदतीला पडणारी ही चंद्राक्का, नेहमीच डोल्याऱ्या आईला दुर्गाताईला धीर देत आलेली आहे. केवळ कष्ट उपसणं आणि त्यातचं संतोष पावणं हा तिचा स्वभाव रूप, संसार, संतती आणि संपत्ती यांचे मनासारखेन तर राहोच पण वाजवी सुखही कधी चंद्राक्काला मिळालेले नाही. चेहऱ्यावर विषण्णता असली तरी आयुष्यात चंद्राक्का कधी कंटाळली नाही.

स्वत: आजारी असतांना सरूताईच्या मंगळागौरीला चंद्राक्का कष्ट उपसते आणि दुस-या दिवशी त्यांचा आजार अधिकच वाढतो. जवळ दोन्हीही मुलं नाहीत आणि मोठा दाव्यात अडकलेला. आईचा वाढता आजार आणि कूटे वकिलांची लोण्यासाठीची घाई. चंद्राक्काकडे लक्ष देण्यास सांगून तो पुराच्या पाण्यात लोण्याचा हंडा घेऊन जायला निघतो.

इकडे चंद्राक्काला अखेरची धाप लागली आणि तिकडे देवगंगेच्या महापुराने पांडूचा बिनदिक्कत बळी घेतला. अशुभात संतोष पावणा-या माणसांनी वेळ साधली आणि चंद्राक्काच्या मृत्यूपूर्वी पावघटका अगोदर तिला पांडूच्या मृत्यूची बातमी समजली. पुत्रशोकाचा टाहो फोडून चंद्राक्का गतप्राण झाल्या.

या सगळ्या कथेत चंद्राक्का या पात्राचा प्रवास आणि त्याच्यावर नियतीचा पडलेला प्रभाव जाणवतो. आणि आयुष्यभर ( आणि मृत्यूनंतरही ) कसल्याच प्रकारची सहानुभूती न मिळालेल्या चंद्राक्काचे व्यक्तिमत्व कारूण्यपूर्णतेने डोळ्यासमोर उभे रहाते .

" श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील पात्रे ही अशी चिर-परिचितापेक्षा वेगळी, असाधारण अशी आहेत. अगदी बालवयापासून ते वृध्दावस्थेच्या सर्व थरांतील ही पात्रे दु:खाचे कडुघोट घेत जगणारी आहेत.

या कथासंग्रहातील " बेणं" ही कथा एका वृध्द म्हातारीच्या

मनोवस्थेचे चित्रण करणारी आहे. या कथेत वर्तमान -भूत यांच्यात अडकलेली म्हातारी राधाआजी दिसते. गतवैभव आणि वर्तमानस्थिती याचे भान राधाआजीला राहात नाही. " बेणं " मधील त्या प्रचंड पडक्या वाडयातील राधाआजी एकाचवेळी वर्तमानातून भूतकाळात प्रवेश करीत आहे" [२२] वास्तवात सगळं वैभव संपलेलं आहे. परंतु म्हाता-या राधा-आजीला या वैभवाचा पुन:पुन्हा भास होतो आहे. ते वैभव डोळयासमोर सतत तरळत आहे. अशा विलक्षण भूत-वर्तमानाच्या वेध घेत राधाआजी हे पात्र साकार होत जाते.

तर याच कथेतील धाकटे मालक, इस्टेट मोडून रोकड करणारे " बेणं " आहेत. त्यांच्या राधाआजीबद्दल असणा-या संवेदना सुरुवातीला बोथट होत्या मात्र नंतर राधाआजीच असणं आणि नसणं यातल्या दरीची जाणीव होते. आणि आजीला " आपले पूर्वीचे गतवैभवाने गजबजलेले जीवन समोर अवतरलेले आहे असा भ्रम होत असतो आणि त्या भ्रमाची एक विलक्षण साक्ष तिच्या नातवाला घडते" [२३]

राधाआजी आणि तिचा नातू यांची आंदोलीत झालेली मनेच अधिक प्रभावीपणे प्रकट झालेली दिसतात. " बेणं " या कथेत राधाआजीच्या भ्रमाची जी दर्शने आहेत,ती जितकी महत्वाची आहेत. त्यापेक्षा या भ्रमात तिची जी जिद्द आहे तिचा तिच्या भटक्या नातवाला जो साक्षात्कार घडतो तो आपल्याला अधिक जाणवतो." [२४] आणि आजीनातू यांच्या सूक्ष्म संघर्षात्मक स्वभावचित्रणातून ही कथा आकार घेते.

माणसांच्या मनातील मुलभूत कामप्रेरणा त्याच्यावर क्षणभर का होईना सत्ता कशी गाजवते याचा विलक्षण प्रत्यय आणि या प्रत्ययातून संयमी, संवेदनशील व्यक्तिमत्वाचे अंग या कथेतील पात्रातून व्यक्त होते.

पहाटेच्यावेळी असाध्य रोगाने पछाडलेल्या नव-याला घेऊन त्याची पत्नी विदया एका भलत्याच स्टेशनावर उतरते. या दोघांची व्यक्तिमत्वे सुरुवातीच्या संभाषणातूनच उभी राहतात.

गरम पाण्याच्या पिशवीची गरज असल्यामुळे विदया स्टेशन मास्तराकडे चौकशी करते आणि दोघेही स्टेशनमास्तराच्या घरी जायला निघतात. जातांना वेळ सांगणा-या स्टेशनमास्तराच्या केसांकडे, ताशीव कपाळाकडे, सणसणीत काळसर मनगटाकडे तिचे लक्ष जाते. तेव्हा ती घुटमळते आणि क्षणभर थिजून रहाते. तिच्या मनाची चलबिचल होतांनाच ती सावरते. मनांतील मुलभूत प्रेरणा आणि संयम याचा वेगळा प्रत्यय तिच्या व्यक्तिमत्वात जाणवतो.

पुढे स्टेशनमास्तराच्या बायकोच्या बाळंतपणात ती आपला धर्म पाळते आणि बाळंतीणीची सुखरुप सुटका करते. कथेच्या शेवटी आपल्या पतीच्या कुशीत डोके खुपसून ती मुसमुसू लागते. पतीला रात्री लागट बोलल्याच्या संदर्भात त्याची क्षमा मागते.

या कथेतील सर्वच घटना योगायोगाने घडत जाणा-या असल्या तरी पात्रांच्या परिणामकारक चित्रणाने कथेला अधिक रंग भरतो.

" श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील पात्रांविषयी प्रा. प्रभाकर पाटील यांचा, " मन:पुर्वक जीवन जगून स्वत:च्या भावनिक मानसिक प्रक्रियांशी कमालीच्या सचोटीने एकरूप राहून केवळ आपल्या भावनिक -मानसिक संवेदितावरून जीवनाची समज आकलू शकणारी त्यांच्या कथांतील व्यक्तित्वे, स्वत:च्या भावानुभवांच्या बाबतीत कसदार आहेत. त्यामुळे व्यक्ती व्यक्तींच्या परस्वर अन्वयार्थातील आंतर-विरोधाला आधारांला घेत घेत, " श्रीशिल्लक, " " बेगं, " " धागे, " " अनिकेत, " " एका स्टेशनमास्तरांची गोष्ट " या कथा अनुभवाच्या वास्तविक ज्ञानाची सीमा केव्हाच ओलांडतात" [२५] हा अभिप्राय, अभ्यास करताना अधिक समर्थनीय वाटतो.

" श्रीशिल्लक " कथासंग्रहातील ही पात्रे मनस्वी आहेत, व्यवहारी आहेत, सोशिक आहेत. ती कुठेच त्रागा करीत नाहीत. कांही काही वेळेला या समाजाचे रीतिरीवाज, व्यवहार त्यांच्या कलासाधनेत कुठेच बसत नाहीत. ही माणसे स्वत:चे असे वेगळे विश्व निर्माण करतात. या विश्वाशी कोणत्याही प्रकारची तडजोड ती करत नाहीत. हे विश्व म्हणजेच त्यांचं जगणंच झालेलं असतं.

" मारवा " ही कथा अशाच दोन प्रवृत्तीच्या पात्रांच्या माध्यमातून आकार धारण करते. एका बाजूला व्यवहारी, पैशा-अडक्याच्या हिशोब ठेवणारा भाऊ तर दुस-या बाजूला या सर्व व्यवहारी जगातून अलिप्त होऊन कलासाधनेत हरवलेला भाऊ. अशा दोन प्रवृत्ती आहेत. दोघेही आपापल्या ठिकाणी सुस्थीर असतेत. या दोन व्यक्तिमत्वातील विरोधामुळे कथा एक वेगळेच वातावरण निर्माण करते.

या कथेतील गुरुनाथ हा व्यवहारी जगापासून अलिप्त आहे. ' चिरमुले यांच्या कथांमधल्या अनेक पात्रांच्या वृत्तीमधून अलिप्ततेचा एक धागा ओवला गेलेला दिसतो. अगदी निखळ वैराग्य नसेल पण सारे सोडून कुठेतरी दूर जावे असे त्यांच्या अनेक पात्रांना वाटते. एक प्रकारची निरंजन वृत्ती किंवा नि:संगपणा कितोतरी व्यक्तिरेखांमध्ये दिसून येतो. [२६] आणि म्हणूनच भावाच्या बंगल्याच्या वास्तुशांतीला योगायोगाने आलेला गुरुनाथ हा सगळं वातावरण भारुन टाकतो. आणि शेवटी न्हाणीघरांत नोटांच पुडकं विसरुन जातो.

' श्रीशिल्लक ' या कथासंग्रहातील वेगळ्या प्रकारची सुखद संवेदना देणारी ' धागे ' ही एकमेव कथा एका पती-पत्नीच्या रुसव्या फुगण्याचा, रडण्या-हसण्याचा हा हलका-फुलका वेगळा अविष्कार आहे. ही दोन्हीही पात्रे मनस्वी, संवेदनशील आहेत आणि या संवेदनशीलतेतून, पात्रांच्या स्वभावचित्रणातून कथेला सर्वस्वी वेगळा आकार येतो.

" धागे " कथेतील पात्रांचा अपवाद वगळता सर्व पात्रांवर दु:खाचा, नियतीचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेशी चिरमुले यांच्या कथेचे साम्य जाणवते. जी. एं. च्या कथेतील पात्राप्रमाणे चिरमुलेयांच्या कथेतील पात्रही एकप्रकारचे एकाकीपण अनुभवतांना दिसतात. उदा. स्वामी, विश्वेश्वर,

सरस्वती, ( श्रीशिल्लक ), सत्यविनायक व्यंकटेश जोशी ( ट्रँपोझ ) भाईजी, ( दि मर्मन ) तो ( दु:ख ) क्लंदर पत्नी ( आवर्त ) सीता, यशवंता ( अनिकेत ), चंद्रकाक्का ( एकेकाचो अखेर, दिलीप, बिरदी, सरकारस्वामी, दिवाणसाहेब, ( युधिष्ठिराचा रथ )

चिरमुले आणि जी. ए. कूलकर्णी यांच्या कथांची तुलना करतांना शांता ज. शेळके म्हणतात, ' जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांत नियतीवाद आहे तर चिरमुले यांच्या कथांत जीवनाची असंगता, अनाकलनीयता आहे' २७ चिरमुल्यांच्या कथेतील पात्रेही एकत्र येतात. परस्परांशी वेगवेगळ्या नात्यांनी संबंध जोडतात आणि तरीही प्रत्येक जण आपआपल्या ठिकाणी एकटीच आहेत. रक्ताचे, नात्याचे, स्त्री-पुरुष प्रेमाचे, वासनेचे बंध असूनही ही माणसे एकाकीच राहतात.

" श्रीशिल्लक " मधील स्त्री पात्रे
---------------------------

" श्रीशिल्लक " मधील स्त्री पात्रांचा अभ्यास करताना एखाद-दुसरा अपवाद वगळता सर्वच स्त्री पात्रे ही नशिबापुढे, नियतीपुढे हताश झालेली, सोशीक आहेत. " श्रीशिल्लक" या कथेतील सरस्वती अधिकारवाणीने कुठेच बोलतनाही.
" जे प्राक्तन आहे ते भोगलंच पाहिले " असे म्हणून नशीबालाच ती दोष देत रहाते. ' नियतीने आपल्या पदरांत जे दान टाकले आहे त्यांचा हताश स्वीकार करण्याचा हा एक मुलभूत समंजसपणा चिरमुल्यांच्या कथेतील अनेक पात्रे करत असतात' २८ हे मत पटते

" आवर्त " कथेतील पत्नीच्या दुःखाचे स्वरूप जगावेगळे आहे. सगळ्यांच्या विरोधाला न जुमानता प्रथमपत्नी हयात असणा-या गायक कलावंताशी ती प्रेमविवाह करते. परंतु तो तिच्याकडे फक्त पुरुषांच्या दृष्टीतून पाहतो. आणि हेच तिचे दुःख आहे. आणि ते ती सोशिकपणे सहन करत रहाते. सगळ्या कथेत या दुःखाचा आवर्त फिरत रहातो.

" एकेकाची अखेर " मधील चंद्राक्का हिला आयुष्यभर कसलीही सहानुभूती मिळाली नाही. दुस-याचे कष्ट उपसण्यात तिचा जन्म गेला. वाजवी सुखही तिच्या वाटयाला कधी आले नाही. आणि मृत्यूपूर्वी एक पावघटका अगोदर पुत्र निधनाची वार्ता तिला कळते आणि पुत्रशोकाचा टाहो फोडून अखेरचा श्वास घेते.

" बेणं " मधील राधाआजी भूत-वर्तमानाच्या चक्रातून बाहेर पडूच शकत नाही.

" श्रीशिल्लक " मधील काही स्त्रीपात्रे, कथेतील मुख्य पात्रांना उठाव देण्याचे कार्य, करतात. " युधिष्ठिराचा रथ " मधील " रूपा" दिलीप आणि बिरदी यांना दोघांना मानसिक आधार देते तर दुःख कथेतील " तारा " विधुर झालेल्या आपल्या प्रियकराचे सांत्वन करीत त्यांच्या मनाला धीर देण्याचा प्रयत्न करते.

कुटुंबाचा आधार ठरलेल्या आणि आपल्या भावविश्वाला जपणा-या स्त्री-व्यक्तिरेखाही या कथासंग्रहात आढळतात. " सुदक्षणा"

( दि मर्मन ) आणि " विद्या " ( एका स्टेशनमास्तराची गोष्ट ) ही दोन स्त्री पात्रे स्वत:बरोबर आपल्या पतीच्या भावना विचारांना जपणाऱ्या आहेत. " दि मर्मन " मधील सुदक्षणा ही संवेदनशील हळवी आहे, तशी वास्तवाचा विचार करणारीही आहे. ती बुंद्धीमान आहे. स्थीर मनोवृत्तीने आपल्या आणि भाईजींच्या भावनेचा ती स्वीकार करते. तर " एका स्टेशनमास्तराची गोष्ट " मधील विध्या पतीची एकनिष्ठेने सेवा करते. ही सेवा करतांना तिने केलेला त्रागा हा पतीप्रेमापोटीच आहे.

" पाईक " आणि " दु:ख " या कथेतील मृत स्त्री पात्रानाही कथानकात महत्वाचे स्थान आहे, " पाईक " मधील नायिका ही, गावांतील पक्षाच्या स्त्रीशाखेची प्रमुख होती. तिच्याबरोबर हा नायक लग्न करणार होता, पण तहशिलाच्या क्रांतीकारी प्रमुखाचा तिच्यावर डोळा होता. परंतु ती बधली नाही, म्हणून तिच्यावर गोळया झाडण्यात आल्या. या कथेतील नायकाची मन:स्थिती नायिकेच्या आठवणीभोवतीच फिरते आहे.

अशाप्रकारे स्त्री पात्राचा अभ्यास करतांना या सर्वच पात्रांचा विकास मानसिक अंगाने झाला आहे. हा विकास दाखवितांना कथाकाराच्या अनुभवविश्वाची व्यापकता दिसून येते.

वरीलप्रमाणे चिरमुले यांच्या पात्रांचा विचार करतांना दु:खाचे कडुघोट घेत जगणारी, नियतीपुढे हतबल झालेली सरस्वती विश्वेश्वर स्वामी ( श्रीशिल्लक ) दिलीप, बिरदी, ( युधिष्ठिराचा रथ ) सीता ( अनिकेत ), तो ( दु:ख ) पहिला मंत्री

( प ाईक ), भाईसाहेब ( दि मर्मन ) चंद्राक्का, ( एकेकाची अखेर ) ही पात्रे आहेत. तशी क्लंदर, असाधारण अपरिचित अशी पात्रेही या कथासंग्रहात आहेत. उदा. गुरुनाथ ( मारवा) तो, ती ( धागे ) राधाआजी, धाकटे सरकार ( बेणं ) सरस्वती विश्वेश्वर, स्वामी ( श्रीशिल्लक ) दिलीप, बिरदी ( युधिष्ठिराचा रथ), इ.

जीवनापासून अलिप्त राहणारी पात्रे म्हणून भाईसाहेब ( दि मर्मन ) गुरुनाथ ( मारवा ) विश्वेश्वर ( श्रीशिल्लक ) या पात्रांचा उल्लेख करावा लागेल.

एकूण " श्रीशिल्लक " मधील पात्रांचा विचार करतांना ही पात्रे विलक्षण, असाधारण असल्याचे जाणवते. चिरमुल्यांची पात्र निवडण्याची परिचितातील अपरिचितता विशेष लक्षात येते. या ठिकाणी चिरमुल्यांनी पात्रांच्या भावविश्वाबरोबर त्यांचे विचारविश्वही कलात्मकतेने रेखाटले आहे.

ही पात्रे सर्वसामान्य नाहीत. त्यांच्यात विलक्षण अपरिचितता दिसते.ही सर्वच पात्रे परिस्थितीपुढे हतबल ठरलेली आहेत. " श्रीशिल्लक " कथेतील " सरस्वती " कुठेही त्रागा करीत नाही. तर " दिलीप " आणि " बिरदी " ( युधिष्ठिराचा रथ ) ही राजघराण्यांतील पात्रे परिस्थितीशी झुंज देण्याचा प्रयत्न करतात. पण शेवटी हतबल ठरुन वाट्याला आलेले

प्राक्तन स्वीकारतात. ( या कथासंग्रहातील सर्वच पात्रे सोशिक-पणे या प्राक्तनाचा स्वीकार करतात ) " आवर्त " ची नायिका सुंदर, श्रीमंत स्थळ नाकारून प्रथम विवाहीत असलेल्या कलंदर गायकाशीच प्रेमविवाह करून आयुष्यभर उध्वस्त मनाने जगते. तर " एका स्टेशनमास्तराची गोष्ट " मधील विदया आपल्या आजारी पतीची सेवा एकनिष्ठेने करते आणि " ऐकेकाची अखेर" मधली चंद्रकलाक्का दुस-याचे कष्ट उपसता उपसता सोशिकपणे मृत्यूला सामोरी जाते.

अशी ही " श्रीशिल्लक " मधील पात्रे सोशिकतेने हतबलतेने रसिकांच्या मनाचा ठाव घेतात. ही सर्वच पात्रे आ प-आपल्या दु:खास स्वत:ला झोकून देतात आणि म्हणूनच रसिक वाचकांच्या मनाला चटका लावून जातात.

संवाद

कथेच्या घटकांमध्ये संवाद या घटकाला अत्यंत महत्व असून कथेचे प्राणभूत तत्व म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. कथेला सजीवता आणण्याचे कार्य संवादातून अधिक चांगल्या त-हेने होते. कथेच्या कथनाचे कार्यही संवादातून होते. तसेच कथेतील व्यक्तीचे अंतरंग समजण्यासाठी, त्या व्यक्तीच्या मनोगताचे

निवेदन करण्यासाठी , प्रसंगाचे निवेदन करण्यासाठी कथाकार संवादाच्या उपयोग करीत असतो. पात्राचे चरित्रचित्रण करणे, कथानकाला आणि कथागत घटनांना गतीशील करण्यासाठीही संवाद कथेसाठी पूरक आहेत. यामुळे कथानकाची परिणामकारकता वाढते.

" श्रीशिल्लक " या कथासंग्रहांतील संवाद मोजक्या स्वरूपाचे परंतु अर्थगर्भ आहेत. " श्रीशिल्लक " ही या कथासंग्रहा-तील एक वरच्या दर्जाची कथा संवादरूपच आहे. संवादाने नटलेल्या या कथेत पात्रांचे भावविश्व सहजपणे आकलन होत जाते. सरस्वतीला विश्वेश्वर बावीस वर्षांनी दिसतो. विश्वेश्वर आल्याचे स्वामीला ती सांगते -

" ठीक आहे, तो आला असेल तर भेटल्याखेरीज राहणार नाहीच पण तू काय ठरवलं आहेस ?"

" कशाचं ? तिच्या स्वरात कंप होता

" तुझं स्वतःचं ?"

" आजवर मी माझं काय ठरवलं आहे ? "

" आता ठरवावं लागेल कदाचित सरस्वती "

" मला कांहीच ठरवायचं नाही. गोपालकृष्ण दाखवील ती वाट " ( पा. नं. ३ )

या संवादातून सरस्वतीच्या मनःस्थितीचे दर्शन घडते. तिच्या मनांत चाललेली उलथापालथ, गोपालकृष्णावर स्वतःचा सोडलेला हवाला आणि त्यातून तिची असाहाय्यता दिसून येते. पुढे

विश्वेश्वर तिला भेटतो आणि " आता गावातला तुमचा वाडा जुनाट झाला असेल नाही ?" या सरस्वतीच्या एकाच प्रश्नात काळाबरोबर मनातेही अंतर दिसून येते. ' तुमचा ' हा एकच शब्द हे अंतर दाखवतो. आणि सरस्वतीच्या या बोलण्याने विश्वेश्वर थोडासा दचकतो. पात्रांच्या अंतर्मनातील भावनांचे चित्रण येथे संवादाने साधले आहे.

विश्वेश्वराने सरस्वतीला भेटण्यापूर्वी मध्यंतरीच्या काळात पुजा-अर्चा सोडली आहे. त्यांच्या मनाची उध्वस्त अवस्था " सरस्वती " सगळ्या कर्मकांडाला मूठमाती दिलीय मी " या एकाच संवादातून व्यक्त होते.

सरस्वती आणि विश्वेश्वर या पात्रांचे व्यक्तिमत्व संवादातून उभे राहते. स्वतःच्या अतर्क्य वर्तनाची संगतीही त्यांना सापडत नाही. विश्वेश्वराने सरस्वतीला दान का केली ? आणि सरस्वतीही मुकाटयाने दानाचा विषय का झाली ?

" खरचं मी कां नाही हो विरोध केला ?" ती गदगूदून स्फुंदत म्हणाली, " तुम्ही उदकं सोडलंत, मी निघुन आले, मी काय करत होते हे मलाच कळत नव्हतं हो " ( पा.नं. ८)

ती विश्वेश्वर किंवा स्वामीला बोल लावत नाही तर स्वतःच्या प्राक्तनाला दोष देते. या संवादातून सरस्वतीच्या

मनाची अगतिक अवस्था व्यक्त होते.

मठांत राहिलेल्या सरस्वतीला स्वामींपासून मुलगा झालेला आहे, हे विश्वेश्वराला सरस्वतीच सांगते. विश्वेश्वर संतापतो. त्यांच्या मनाची तगमग, " गुरुवर्य, काय हे करून ठेवलंत ? प्रत्येकाच्या आयुष्याची एक एक धुनी तुम्ही पेटवून ठेवलीत. श्रेय काय ? बोलावणं येईपर्यंत जळत रहायचं " या संवादातून दिसते.

विश्वेश्वर सरस्वती, सरस्वती -स्वामी, विश्वेश्वर स्वामी यांच्या परस्पर संवादातून तिघांच्याही मन:स्थितीचे दर्शन होते.

अगतिकतेने पोळलेल्या विश्वेश्वराचे सांत्वन करताना स्वामी म्हणतात, " जगात कुणी कुणाचा गुरु होऊ शकत नाही बाबा. माझ्या दुर्दैवी आयुष्याच एवढच काय ते सार निघण्यासारखं आहे." या संवादातूनही स्वामीच्या पश्चातापदग्ध स्वभावाचे दर्शन घडते.

स्वत:ला ' दान ' वस्तू समजणारी सरस्वती, अहंकाराने दान स्वीकारणारे स्वामी, वेळ निघुन गेल्यावर त्यांना आलेली विरक्ती आणि बावीस वर्षांनी सगळ्या कर्मकांडाला मूठमाती देवून, कुलस्वामिनीला गंगार्पण करून आलेला विश्वेश्वर या सर्वांच्या भावना संवादातून व्यक्त होतात.

अशाचप्रकारे पात्रांच्या स्वभावाचे सूचन " पाईक " या कथेत दिसून येते. ही संपूर्ण कथाच संवादात्मक आहे.

पहिला मंत्री आणि दुसरा मंत्री यांच्यातल्या संवादातून एका असफल प्रीतीचे दर्शन घडते. पुढारी आणि पक्षप्रमुख यांच्या मनोवृत्ती कळून येतात. आणि त्यांच्या या मनोवृत्ती-मुळेच गावे ओस पडलेली आहेत.

गावाच्या दिशेने हात पसरून तो पुढे म्हणाला,
" जीवंत माणसांची वस्ती कुठं संपते नी मेलेल्याची कुठं सुरु होते, तेचं समजेनासं झालंय "

" हिला कुणी मारलं ? दुस-याने विचारले,

" येत्या उन्हाळयात आम्ही लग्न करणार होतो" पहिला उद्गारला, " पण अखेर त्यांनी तिला आपल्या सापळयात अडकवलं, फार हाल केले तिचे",

" पण तिचा काय गुन्हा होता ? " हे विचारताना दुस-याचा चेहरा पांढराफटक पडला होता.

" तिचा काय गुन्हा होता ! " एक मोठा आवंढा गिळून पहिल्याने तोच प्रश्न स्वत:शी उच्चारला ( पा. नं. ५५ )

या संवादातू न राजकीय पक्षाच्या वैमनस्यातून घडलेली भीषणता लक्षात येते. आणि पहिल्या मंत्र्याच्या संवेदनाशील मनाचे प्रत्यंतरही येते. त्यांच्या प्रेयसीला ती बधत नाही म्हणून ठार मारण्यात आले होते.

कथेच्या शेवटी -

" काय पाहतोस ?" दुस-याने विचारले,

" अरे देवा ! एवढा मोठा पुढारी हा केव्हापासून झाला ?" पहिला कपाळावर हात मारून उद्गारला, " अरे हाच तो दैत्य. " ( पा. नं. ५८)

पात्रांच्या मनाची असहाय अवस्था संवादांनी साधली आहे. पात्रांच्या स्वभावाचे दर्शनही या संवादांनी साधले आहे.

संवादाचे आणखी एक कथात्म कार्य म्हणजे कथानकाला किंवा कथागत घटकांना गतीशील बनविणे हे कार्यही " श्रीशिल्लक " मधील संवादानी साधलेले दिसून येते. " श्रीशिल्लक " या कथेतील -

" काय साकडं घातलंस आज गोपाळकृष्णाला ? " स्वामींनी विचारले,

" बाकी गोपाळकृष्ण तुला वचकूनच असेल, तुझं साकडं तो स्वीकारत नाही म्हणजे काय गोष्ट आहे ? "

" मी केवळ त्यांच्या पायावर डोक ठेवून आले, तिन्हि-सांजेची वेळ झाली होती"

" ही काही तुझी नेहमीची रीत नाही " उत्तर न देता ती स्तब्ध बसून राहिली.

" मला न सांगण्यासारखं असं काही घडलं का आज ? "

" आपल्याला न सांगण्यासारखं अस आता काय राहयलयं ?" ( पा. नं. २ )

हा संवाद कथानकाला गतीमानता प्राप्त करून देतो. कारण वाचकाची उत्कंठा वाढवण्याचे सामर्थ्य या संवादात आहे. कांहीतरी घडलं आहे आणि ते सरस्वती सांगत नाही. ती स्तब्ध बसून राहते. सांगण्यासारख कांहीच राहिलेल नाही असं ती म्हणतांना तिच्या मनातील घालमेल आपल्या लक्षात येते.

अशाच प्रकारचा कथानकाला गतिमानता प्राप्त करून देणारा संवाद " मारवा " या कथेत दिसतो. योगायोगानं गुरुनाथची आणि मेजर पत्कींची भेट होते. त्याला घेऊन त्याच्यासह मेजर पत्की " पूर्तता " बंगल्याच्या वास्तशांतीसाठी येतात. बंगल्यात आल्यानंतर पाण्यात दूध मिसळावे इतक्या सहजतेने तो तिथल्या वातावरणात एक होऊन जातो.

" मी नंतर ती चीज बसवण्याचा प्रयत्न केला" ती मुलगी सांगू लागली," पण सारखी पुरियात शिरायची "

" अलबत जाणार! मारवा असा सहजा सहजी हातात गवसणारा राग नाही पोरी, फार विरक्त आणि लहरी आहे". गुरुनाथ स्वत:ला विसरुन बोलू लागला " बाईजी पैगंबरवासी झाल्या तेव्हा बांधलेली चीज आहे ती"

" बाईजी " १ ( पा. नं. ४६)

या संवादातून कथेला गतिमानता प्राप्त होतेच आणि मारवाची जन्मकथा सांगताना कथा एक वेगळेच परिणाम साधते.

" पाईक " कथेतही दोन संत्र्यामधले संवाद असेच आहेत. " पण काय रे ? शत्रू शत्रू म्हणून आपण म्हणायचं खरं, पण शेवटी ती आपलीच माणसं आहेत ना ?"

" पण ती आपल्या पक्षाला विरोध करतात ना ? एक वर्षाखाली झालेला पक्षाच्या पुढा-याचा खून....पहिला म्हणाला.

" छे, छे, छे, ती आठवणसुध्दा नको" दुसरा शहारुन म्हणाला, " काय ती यमपुरी ! दहशत आणि नंतरची कत्तल"

पक्ष-पक्षातील वादातून होणारी कत्तल आणि त्यातून निर्माण होणारी भीषणता याची अंगावर शहारी आणणारी प्रतिक्रिया व्यक्त होते. आणि कथांतर्गत घटकांना अधिक गतिमानता प्राप्त होते.

" एका स्टेशनमास्तराची गोष्ट " या कथेतही अशाच प्रकारचे संवाद आढळतात.

कथेला आणि कथांतर्गत घटकांना गतिमानता आणण्याचे कार्य असे संवाद करतात तसे भावनांचे आणि भावनात्मक संघर्षाचे चित्रण करण्याचे कार्यही संवादानी होते. हा संघर्ष संवादातून व्यक्त होतांना अधिक परिणामकारक होतो, " श्रीशिल्लक" या कथासंग्रहातील संवाद हे भावनात्मक संघर्षाचे चित्रण परिणामकारकतेने साधतात. " श्रीशिल्लक " या कथेतील -

" खरंच ! मी का नाही हो विरोध केला ?"
ती गदगदून स्फुदंत म्हणाली, " तुम्ही उदक सोडलंत मी
मी निघून आले. मी काय करत होते तेच मला कळत नव्हत
हो !"

या संवादातून सरस्वतीच्या मनातील द्वंद्व वाचकांच्या लक्षात येते. बावीस वर्षांपूर्वी घडलेल्या घटनेच्या संदर्भात - सरस्वतीची मन:स्थिती लक्षात येते. आणि हा भावनिक संघर्ष ठाशीव स्वरूपात लक्षात येतो.

" युधिष्ठिराचा रथ " कथेतील बिरदी आणि दिवाण-साहेब यांच्यातला संवाद भावनिक संघर्षच व्यक्त करतो.

" बिरदीच्या नाकपुड्या लाल झाल्या, कानशिले, तापली, डोळयांत हिंस्त्रपणा आला, दोन्ही हाताच्या मुठी टेबलावर दणादणा आपटून तो किंचाळला, " मी संस्थानाच्या दिवाणाशी बोलतो आहे, आणि मला वाटत दिवाणसाहेब जिंवत आहेत " ( पा. नं. १८८)

हा संवाद आणि त्याच्यापुढील बिरदीचे सगळेच संवाद त्यातून त्याच्या मनातील संघर्षच व्यक्त होतो.

बिरदीला कर्नाटकात पाठवायचे निश्चित होते आणि बिरदी त्याजवळ येतो, तेव्हा त्यांच्यातला संवाद ( पा.नं. १९१-९२ ) हा सुद्धा असाच भावना-संघर्ष व्यक्त करतो.

पात्रांच्या भावनांचा संघर्ष हा काल्पनिक संघर्ष असतो. परंतु हा संघर्ष जेव्हा संवादातून व्यक्त होतो तेव्हा तो वाचकाच्या हृदयाला चटका लावून जातो. त्याचबरोबर कथेचा आशय इतका परिणामकारक होतो की, ते दृश्य डोळ्यासमोर तरळू लागते. आणि कथा संभाव्यतेच्या कोटीत जाऊन बसते.

" राणी सरकार निधन पावल्या तेव्हापासून राजवाड्यात खानदानी स्त्रीचा वापर नाही" दिवाणसाहेब म्हणाले, " देहाच्या आसक्तीपलीकडची माया अनुभवल्यावाचून देहाच्या अभिलाषेलाही काही अर्थ येत नाही धाकटे सरकार, त्याकडं आपण जाता ते याच हेतूनं; खरं ना ?"

" दिवाणसाहेब " धाकटे सरकार किंचीत आरामात बसत म्हणाले, " आपण आमच्याबद्दल इतका खोल विचार केला असेल, असं आम्हांला वाटलं नव्हतं" ( पा.नं. २०१ )

या संवादातूनही त्या-बिरदी, त्या- धाकटे सरकार, दिवाणसाहेब यांच्यातला भावनिक संघर्ष लक्षात येतो.

युधिष्ठिराचा रथ" मधील या संवादातून निवेदनाचे कार्य चांगल्या प्रकारे होते, कथाकाराला निवेदनापासून जे सांगता येते ते तो संवादातून चपखलपणे व्यक्त करत असतो. म्हणजे निवेदनाचे कार्यही संवादांनी केले आहे.

" वेणं " ही कथा भूत आणि वर्तमान अशा दोन्ही काळात आपणासमोर येते राधाआजी नववधू असतानाचा काळ ते आजची राधाआजी म्हणजे कथाकाराने जवळजवळ अर्धशतकाचा काळ निवेदनातून व्यक्त न करता संवादातून केला आहे.हे कौशल्य

कथाकाराने साधले आहे.

राधाआजी भूतात बोलते तर धाकटे मालक वर्तमानात आणि अशाप्रकारे पन्नास वर्षांच्या स्थळकाळाची एकात्मता संवादातून साधली आहे. राधाआजी रात्रीच्या वेळी बाहेर चांदण्यात जाऊन भूतकाळाशी एकरुप होऊन बोलू लागते आणि धाकटे मालक पडकन उठले. राधाआजीच्या कमरेला मिठी घालून तिच्या कुशीत आपला हुंदका दडवीत ते ओरडले, " आज्जे कुणाशी बोलतेस तू ? "

आपल्या वाटेकडं मी डोळे लावून असते. माहीत नाही का ? राधाआजी बोलतच होती, " माझा जीवन इथं काळजीनं निम्मा होतो"

" आज्जे झालीस का जागी ? " राधाआजीला तिच्या अंथरूणावर आणून बसवति गहिवरलेल्या आवाजाने धाकट्या मालकांनी विचारले, " कुणाशी बोलत होती आज्जे ? "

राधाआजी शून्य नजरेने चांदण्याकडे पाहात होती, तिने थंडपणाने उत्तर दिले, असं काय करता जाऊबाई, ? इकडची स्वारी दत्ताचं दर्शन घेऊन एवढयात आली आणि घोडयावरनं रवाना झाली."

" आम्ही कोण आज्जे ? भानावर आलीस का ? " ( पा. नं. १२६-४७ ) राधाआजीचे भूतकाळातील भावजीवन आणि वर्तमानकालरन धाकटे सरकार यांच्यातील हा संवाद रेखाटण्यातील कथाकाराची वेगळी शैली दिसून येते. जुन्या आणि नव्या अशा दोन्हीही वातावरण-संवादातून कथा उच्च दर्जाचा परिणाम साधते.

वरील संवादातून कथांतर्गत पात्रांची भाषा ही लिंग-भिन्नतेनुसार, मन:स्थितीनुसार वेगवेगळी असल्याचे दिसते. माणसाच्या मनातील विविध पैलूंचे दर्शनही यांतून घडते.

माणसांच्या मनाचे वेध घेणे, हे चिरमुलेंच्या कथांचे वैशिष्ट्य आहे. माणसांच्या भावना, त्यांची दु:खे, त्यांचे कौटुंबिक भावविश्व यांतच त्यांची लेखणी रमते. माणसाच्या शोध ते विलक्षण रीतीने घेतात.

" धागे " ही कथा मोजके संवादरुप घेऊन येते. या कथेतील निवेदन तृतीयपुरुषी आहे. परंतु मोजक्याच संवादातून पती-पत्नींच्या मनोवस्थेचे नाजूक धागे व्यक्त होतात आणि कथा कलात्मक होत जाते.

" बँकर-ट्रेडर-मॅनेजर " कथा पात्रामुखी निवेदन पद्धतीनेच साकार झालेली पण यातील संवाद हे भाषा, शब्द यांच्या योग्य वापरातून साकार झालेले आहेत.

आतापर्यंतच्या अभ्यासातून पात्रांच्या मनातील गुढतेचा, भावनेचा प्रत्यय संवादातून येतो, " श्रीशिल्लक " मधील सरस्वती " मारवा", मधील गुरुनाथ, " पाईक " मधील पहिला संत्री, " धागे " मधील तो, ती, " बँकर-ट्रेडर-मॅनेजर" मधील निवेदक यांच्या स्वभावातील भावनात्मक गुढता स्पष्ट करण्याचे कार्य संवादातून घडते.

" श्रीशिल्लक " मधील संवादाबाबत वा. ल. कुलकर्णी म्हणतात,‘ चिरमुलेयांच्या कथांमधील ही अर्थपूर्ण संभाषणे हा

सदर कथांचा एक अत्यंत उल्लेखनीय विशेष आहे. परंतु आपल्या वागण्याबोलण्याने जागरूकपणे निरीक्षण करु पाहणारी आणि त्यांना अर्थ लावू पाहणारी ही चिरमुल्यांच्या कथेतील व्यक्तीसंपन्न पात्रे कथेच्या शेवटी असहाय वाटतात. स्वत:चे भवितव्य ती स्वत: ठरवू शकत नाहीत. कोणात्या तरी अव्यक्त व्यक्तीच्या हातातील ती बाहूली आहेत. ती शक्ती त्यांच्या जीवनाशी खेळते आहे व त्यांना खेळवते आहे असाच भास, त्या कथा वाचून झाल्यावर आणि वाचीत असताना निर्माण होतो"[२८]

कथेतील पात्रे आणि त्यांचे व्यक्तीमत्वे संवादातून उभी राहतात आणि जीवनाविषयीचे त्यांचे चिंतनही लक्षात येते " श्रीशिल्लक " मधील कांही पात्रे चिंतनशील, वैचारीक जाणवतात, " मारवा " मधील नानासाहेब उद्गारले, " भाऊ तुमचीच ही पुण्याई, " आणि पुढे, " स्वत:च्या उन्नतीचे श्रेय मनुष्य असे दुस-याला का देऊ करीत असतो- " अशी एक शंका दुस-याच क्षणी त्यांच्या मनात येते. तर " बँकर-ट्रेडर-मॅनेजर" मधील नायकाची बदलत जाणारी आवस्था संवादातून व्यक्त होते. तसेच " दि मर्मन" मधील " भाईजी " यशस्वी जीवन जगलेले आहेत. मात्र त्यांच्या या यशाचा उपभोग त्यांच्यातल्या " मी " ला कधीच घेता आलेला नाही असे त्यांना वाटते. म्हणून ते म्हणातात, " यश मिळविणारा "मी " कोणीतरी वेगळाच होतो, तर सुदक्षणा जीवनाकडे समरसतेने पाहणारी आहे. जीवनातील दुस-याची दु:खे पाहून भावनावश होणारी, आणि कलास्वादात रंगणारी आहे. जीवनाकडे पाहाण्याचे दोघांचे

दोन दृष्टिकोण आहेत. रसपूर्ण जीवन जगू इच्छिणारी सुदक्षणा दुसऱ्याच दिवशी कॉन्फरसमध्ये पेपर वाचीत असतांना मृत्यू पावते, हे शेवटच्या संवादातून कळते.

संवादातून व्यक्त होणारे पात्रांचे भावविश्व, त्यांचे जीवनविषयक दृष्टीकोन कथानकाची व्यापकता वाढवतात.

एकंदरीत चिरमुले यांच्या " श्री शिल्लक " मधील संवादाचे स्वरुप पाहिल्यानंतर संवादाने वेगवेगळे कार्य साधल्याचे लक्षात येते. पात्रांचे स्वभावदर्शन घडवण्याचे, कथानकाला गती देण्याचे आणि भावनिक संघर्ष ताकदीने रेखाटण्याचे कार्य संवादानी साधलेले आहे.

चिरमुल्यांची भाषा ही पात्रानुसार वेगवेगळी रुपे धारण करुन समर्थपणे व्यक्त होते. " श्री शिल्लक " मधील सरस्वती, स्वामी, विश्वेश्वर यांच्यातील संवाद, " मारवा" मधील गुरुनाथचे निवेदन, " धागे " मधील पती-पत्नी संवाद, एका स्टेशनमास्तराची गोष्ट " पती-पत्नी संवाद तर " दि मर्मन" मधील भाईजी-सुदक्षणा संवाद, " युधिष्ठिराचा रथ " मधील धाकटे सरकार, बिरदी, सरकारस्वामी, दिवाणसाहेब यांच्यातील संवाद हे वेगवेगळया पातळीवरुन कथानकास समर्थ बनवितात.

" श्री शिल्लक " कथासंग्रहातील संवाद हे अर्थवाही, आशयगर्भ आणि कथेला संपन्नता प्राप्त करुन देणारे आहेत.

वातावरणनिर्मिती

कथेला सजीवता प्राप्त करून देण्यात वातावरणनिर्मितीची ही शूपमोठा वाटा असतो. ही वातावरणनिर्मिती कथेतील पात्रे आणि त्यांची कृती यांच्याशी संबंधित असते. " कोणत्याही विशिष्ट भूप्रदेशात विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर घटना-प्रसंग घडत असतात हे स्थळकाळाचे उचित दर्शन घडविणे म्हणजेच पार्श्वभूमी किंवा वातावरणनिर्मिती होय"[२९] वातावरणनिर्मितीमुळे कथेला सौंदर्य प्राप्त होते.आणि कथेतील घटनाप्रसंग आणि व्यक्तीचे स्वभाव यांच्यातील संबंध स्पष्ट होतो.

" श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील कथामधून कौटुंबिक सामाजिक, राजकीय, धार्मिक पार्श्वभूमीतून वातावरण आपल्या-समोर येते. " श्रीशिल्लक " या पहिल्याच कथेत धार्मिक वातावरणाची छाप वाचकांच्या मनावर पडते आणि कथा अधिक अर्थपूर्ण होते. मंदिराच्या परिसरात घडणाऱ्या विविध घटना आणि त्यातून उध्वस्त होणारे पात्रांचे भावविश्व या कथेत वातावरणामुळे अधिक चांगल्या तऱ्हेने अभिव्यक्त होते. कथेच्या सुरुवातीला तिन्हिसांजेच्यावेळी, सरस्वती गोपालकृष्णाच्या पायावर डोके ठेवते, याच वातावरणात सरस्वतीला स्वामी-पासून मुलगा होतो, आणि याच वातावरणात विश्वेश्वर सरस्वतीला पुन्हा भेटतो.

सरस्वतीला विश्वेश्वराने दान केले त्यावेळी त्यांची मानसिकता धार्मिक होती. परंतु जसजसे या धार्मिक वातवरणापासून तो दूरवर जात राहिला तसतसे त्याचे धार्मिक जीवन संपत गेले. त्याने कुलस्वामिनीला गंगार्पण केली आणि तो हॉटेलचालक, जुगारी बनला. ही परस्परविरोधी वर्तणूक वातावरणाच्या विरोधीलयीतून घडलेली आहे.

विश्वेश्वराचे अध:पतन या बदलणाच्या धार्मिकतेतून होते. परंतु स्वामींचे वर्तन मात्र या धार्मिक वातावरणात घडते. त्यांनी भक्तांनी दिलेले राजवैभव याच वातावरणात भोगले आणि सरस्वतीचे दान स्वीकारल्यानंतर मुलगा झाल्यानंतरची विरक्ती याच वातावरणात भोगली स्वामींच्या मन:स्थितीची जाणीवही या वातावरणातूनच कळते.

सरस्वतीने तर आपल्या प्राक्तनाचा हवाला गोपालकृष्णावर सोपवलेला आहे. गोपालकृष्ण दाखवील ती वाट स्वीकारण्यापलीकडे तिच्या हाती कांहीही शिल्लक राहात नाही. शेवटी या पवित्रमय वातावरणात, "तुझी आई एका बोकेसंन्याशाचा हात धरुन पळून गेलीय" हा तिच्यावर आलेला प्रवाद, तिची संपूर्ण मानसिकता उध्वस्त करतो.

चिरमुले माणसाच्या मनाचा विलक्षण वेध घेतांना दिसतात, ही सगळी माणसे मध्यम वर्गीय वातावरणातील असली तरी त्यातही वैविध्यता आहे. त्यांची मानसिकता वेगवेगळी असते. या विविधतेचा ते प्रामुख्याने विचार करतात आणि माणसाचा शोध विलक्षणरीतीने घेतात.

ही माणसे वेगवेगळ्या पातळीवरची, विविध वयोगटातील आहेत. यशवंता, डोल्यासारखी बालवयातील आहेत, धाकटे सरकार उर्फ दिलीप, बिरजू, " ट्रपीझ " मधील जोशी सारखी कुमारवयातील आहेत. विद्या, स्टेशनमास्तर " दुःख " मधील " तो " व " तारा, " " धागे " " मधील " तो, " " ती " यासारखी तरुण वयोगटातील आहेत, नानासाहेब " सुदक्षणा" भाईजी, स्वामी, सरस्वती, विश्वेश्वर, यांसारखी प्रौढ वयोगटातील आहेत, तर राधाआजी, चंद्राक्कासारखी वृध्दावस्थेतील आहेत. शिवाय डॉक्टर, मॅनेजर, स्टेशनमास्तर, सैनिक, गायक, शहरी खेडवळ, सुशिक्षित, अशिक्षित अशा वेगवेगळ्या व्यवसायातील ही पात्रे या कथासंग्रहात आढळतात. त्यांच्या कृती-उक्ती या विशिष्ट स्थळ-काळ वातावरणात घडतांना दिसतात.

" ट्रॅपीझ " मध्ये कथेच्या सुरुवातीलाच परीक्षा हॅालमधील वातावरण आपल्यासमोर येते. वेगवेगळ्या अवस्थेत डेस्कपर्यंत माना झुकवून लिहीणारे विद्यार्थी, हात मागे बांधून संथपणाने फिरणारे पर्यवेक्षक आणि वर्गाबाहेरचे डोळे दिपून टाकणारे लखलखीत उन्ह.....या पार्श्वभूमीवर सत्यविनायक, व्यंकटेश जोशी, या पात्राचा परिचय आपल्याला होतो.

तरुण वयातील जोशी परीक्षा हॅालमध्ये असतांना त्याच्यासमोर भूत-वर्तमान सतत फिरट्या घालते, आणि या वातावरणात कथा अधिक अर्थगर्भ होते. त्याच्यासमोर कॅालेजजीव-नातील चार वर्षे उभी राहातात. पुढे लगेचच त्याला उमा गडकरीच्या आणि आपल्या लग्नाच्या धांदलीचे दिसते.

त्याचवेळी माजघरातील आईचे कण्हणेही ऐकू येते. अशा रचनातंत्रात ही कथा एकाचवेळी जोशीच्या मनाची दुभंगली अवस्था नजरेसमोर आणते. हे दुभंगलेपण " पिवळी उन्हे," " चांदण्यातल्या गप्पा," " नदीचे गार गार पाणी", अवर्षणामुळे निघालेल्या लंगड्यासारखी स्थिती, " कनवाळू सावली", " नदीकाठ , उन्मनी पडदे यांसारख्या प्रतिमा प्रतिकातून वातावरणनिर्मिती साधली आहे.

भूत आणि वर्तमान अशा दोन्ही वातावरणात घडत असलेली कथा म्हणून " बेणं " कथेचाही उल्लेख करता येईल या कथेतील राधाआजी शरीराने वर्तमानात वावरते तर मनाने भूतकाळात. अशा वेगळ्या, रचनातंत्राने ही कथा आपल्यासमोर येते. राधाआजी तांदूळ निवडता निवडता थांबते आणि तिला समोर दृश्य दिसू लागते " मागल्या कुसवातला पाणदरवाजा सताड उघडला होता आणि दरवाजापासून बाहेर लांबवर पोत्यांनी ठेवलेल्या बैलगाड्याची रांग लावलेली होती. राधाआजी नवल करु लागली. या वर्षी पाच आणे पीक तरी पदरात पडेल की नाही याची पंचक्रोशीत चिंता होती. आणि इथे पोत्यांच्या थप्प्या . ( पा. नं. १३२ ) या दृश्यातून राधाआजीचे गतराज वैभव चलत् चित्रपटाप्रमाणे डोळ्यासमोर उभे राहते. कथेच्या सुरुवातीलाच या वातावरणाने कथेची वीण घट्ट पकडली आहे.

कथेमध्ये, राधाआजी भूतकालीन वातावरणात हरवते तर त्याचवेळी धाकटे मालक वर्तमानात वावरत असतात. भूतकाळात हरवलेली राधाआजी आपल्या मालकाशी, पतीशी बोलत असते तर धाकटे मालक वर्तमानात बोलतात. अशा वेगळ्या रचनातंत्रातली कथा वातावरणनिर्मितीने सौंदर्यपूर्ण बनते.

अशाच प्रकारची एकाचवेळी वर्तमानात व भूतकाळात याचा समेळ घालणारी कथा म्हणून " आवर्त " कथेकडे पहाता येईल. कथेची सुरुवातच वातावरणनिर्मितीने साधलेली आहे. ( पा. नं. १६८ ) या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानात " धोरला मघाशीच उठून बाहेर पडला, काय कारणा१ तीनला अंकाचा बटवडा सुरु होतो, थंडी असो वा पाऊस असो, पहाटेला शंभर सव्वाशे घरं अंक टाकीत वणवण भटकंती केली पाहिजे..." त्याचवेळी जोडून येणारा हा भूतकाळ... धोरला गाणं शिकणार होता त्याचं दहा दिवसाच मुटकुळ छातीशी धरुन तो म्हणायचा, " माझा रक्तामांसाचा शिष्य" ( पा. नं.१६९ ) अशा विरोधी, वातावरण प्रसंगातून सुमित्राच्या मनात आवर्त निर्माण होत राहातात.

वर्तमानात शिवणकाम करुन संसार रेटणारी नायिका आपल्या आयुष्याचा पट मांडले आहे. कथेतील आनंदी क्षणांचा भूतकाळ आणि आजचा शुन्न करणारा वर्तमानकाळ आणि त्यावरचे तिचे भाष्य अशा वातावरणांत ही कथा घडते.

" श्रीशिल्लक " कथासंग्रहात वातावरण हे विविधतेने वाचकांसमोर येते " मारवा " ही वरवर पाहता कौटुंबिक वातावरणातील कथा. वास्तुशांतीच्या निमित्ताने नातेवाईक मित्रमंडळी एकत्र येतात. सकाळी वास्तशांतीचा विधी आणि जेवणावळ झाल्यानंतर संध्याकाळच्यावेळी निमंत्रितांसाठी अल्पोहाराचा बेत आहे; आणि " वरच्या प्रशस्त दिवाणखाना त्यासाठी सजविण्यात आला. फरशीवर गुळगुळीत आकाशी रंगाचे लिनोलियम, मंद, सुसह्य प्रकाश देणारे पुर्ण चंद्राकृती दिवे, अंतराअंतरावर मांडलेली दहाबारा टेबले आणि भोवतीच्या खुर्च्या अनेक पदार्थांनी भरलेल्या अनेक आकारांच्या बश्या, कोप-यात मांडलेल्या पामच्या चितळी कुंडया, शुभ्र पोशाखातले अदबशीर अबोल सेवक....'या स्थलवर्णनाने बंगल्यातील वातावरणाची कल्पना येते.

अशा वातावरणात योगायोगाने भेटलेल्या गुरुनाथला घेऊन मेजर पत्की, " पूर्तता" बंगल्यात येतात. आणि कथानकाला कलाटणी मिळते. गुरुनाथ बंगल्यातील वातावरणात पाण्यात दूध मिसळावे इतक्या सहजतेने मिसळून जातो. वसंताच्या मित्रमंडळीशी गप्पा मारतांना मारव्याचा विषय निघतो. आणि गुरुनाथ " मारव्या"ची जन्मकथा सांगतांना तंबोरे घेण्याची सूचना करतो आणि " माई कासे कहूँ मोरे मनकी व्यथा",

"...मनुष्यवस्तीपासून दूरवर एकोकडे असलेले काळ्या पाषाणांचे जीर्ण शिवालय. उध्वस्त होत चाललेल्या भिंती अन् त्यातून उगवलेले, वा-याने झुलणारे पिवळपांटेरे गवत. निवा-यासाठी सूर्यास्ताच्या सुमारास तेथे थांबून राहिलेला अज्ञात पांथस्थ

हेमाडपंथी गाभा-यातला ओलसर दर्प अन् तुटलेली कोळिष्टके, कोणितरी केव्हा तरी मांडलेली तीन दगडांची चूल, त्यातली रक्षा : बाहेर संधिप्रकाशात धूसर होत चाललेला आकाशाचा घुमट...( पा. नं. ४७)

जसजशी रात्र वाढत जाते तसतशी मैफल रंगत जाते. सुरांना शब्दांत पकडण्याचा कथाकाराचा प्रयत्न वैशिष्टयपूर्ण आहे.

संपूर्ण कथा संगीताच्या वातावरणाने भारुन जाते.

या कथासंग्रहातील कथा घर, कुटुंब या संगळयाभोवती फिरताना दिसतात, माणसा-माणसांतील प्रेम, रुसवे- फुगव हेवे - दावे, आसक्ती, दु:ख, उद्विग्नता या भावना वातावरणाच्या पार्श्वभूमीने परिणामकारतेने वाचकांच्या मनात रस-निर्मिती करतात.

" धागे " ही पती-पत्नीमधील कथा भावबंधाचे चित्र रेखाटणारी आहे. चित्रपटाला येण्याचे कबूल करुनही तो विसरुन जातो, म्हणून तिचे रागावणे, जेवणाच्यावेळी त्याचे रागावणे, मग समझोता. अशा प्रकारचे ऊन-सावली सारखे वातावरण या कथेत दिसते. उंदीर मारण्याच्या नाटयमय प्रसंगाने कथेत मिश्किलता येते. कथेच्या शेवटी " तो " ससा-सारखा गाढ झोपतो आणि " ती " सुईखाली एक चिमुकले झबले सरकवते.

रुसव्या-फुगव्यातून साकारलेल्या वातावरणातून पती-पत्नीतील प्रेमाचे भावनिक " धागे " गुंफले आहेत. ही संपूर्ण कथा कौटुंबिक वातावरणातून येते.

अशाच प्रकारचे कौटुंबिक वातावरण " दि मर्मन", " दु:ख " या कथांतही दिसते.

तर " बँकर -ट्रेडर-मॅनेजर" या कथेत नायक आणि त्याचा मित्र विश्वनाथ यांच्यातील मैत्री आणि त्या संदर्भात बदलत जाणारी भावनावस्था या कथेत दिसते. एका बाजूला अल्पसंतुष्ट, मेहनती, बुध्दिमान असलेल्या नायकाची मनोवृत्ती आणि दुसऱ्या बाजूला चैन,रेस, जुगारी असलेला मित्र विश्वनाथची विलासी वृत्ती यांतून अनेक प्रसंग निर्माण होतात. विरोधी मनोवृत्तीतून निर्माण होणारे प्रसंग आणि त्यासाठी लागणारी चित्तवेधक वातावरणनिर्मिती मोजक्या शब्दातून व्यक्त होते.

विशिष्ट घटना-प्रवृत्तीतून कथा घडत असते. या घटना विशिष्ट स्थळकाळात घडत असतात. म्हणजेच वातावरण निर्मितीमध्ये स्थळाला आणि काळाला महत्त्व असते. " श्रीशिल्लक" कथासंग्रहातील कथांमध्येही स्थळ काळाच्या पार्श्वभूमीतून वातावरणनिर्मिती होते.

तसेच " श्रीशिल्लक " मध्ये निसर्गाच्या माध्यमातूनही वातावरणनिर्मिती साधलेली आहे. किंबहुना या कथांतून निसर्गाला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे.

" पाईक " कथेची सुरुवात निसर्गचित्रणातून झालेली आहे.

" कोण हा थंडीचा कडाका ! " पहिला संत्री दात आवळून घेत कसेतरी दुसऱ्याला बोलला.

" फारच भयंकर ! " दुसऱ्याने कष्टानेच उत्तर दिले, " धुकंसुद्धा किती पसरलंय दक्षिणेत आता पाऊस सुरु झाला असेल."

" दोनअडीच तरी वाजले असतील नाही ? " पहिल्याने विचारले.

" हां हां सहज...चंद्र तर मावळतीकडेझुकलाय. " दुसरा आकाशाकडे पाहात म्हणाला परमेश्वराचे नाव घेऊन त्याने एक दीर्घ जांभई दिली"

या निसर्गचित्रणातून कथेची सुरुवात होत असताना कथानकाची उत्कंठा वाढते. सुटसुटीत व आटोपशीर संवादाच्या माध्यमातून उभ्या राहणाऱ्या निसर्गवर्णनाने कथानकाचा प्रवाह सुरु होतो. कथा वाचकाच्या मनाची पकड घेते.

" पाईक " कथेत या निसर्गवर्णनातून वातावरणनिर्मिती कथाकाराने साधलेली आहे तशी श्राव्य संवेदनाच्या माध्यमातूनही निर्माण झालेल्या वातावरणानिर्मितीमुळे कथानकाला उठाव दारपणा आलेला आहे, " ठक...ठॉक...ठक...ठॉक...ठक...ठॉक..ठक - धुक्यातून पावले वाजली. " थांबा कोण आहे ?" दोघेही सावध उभे राहून ओरडले

" मित्र "

" परवलीचा शब्द "

" ईश्वराची हद्दपारी " ( पा. नं. ५३)

युद्धाचे वातावरण आणि त्यातून सैनिकांची शिस्त याचे भयप्रद दर्शन कथेत दिसते.

निसर्गवर्णनाचा उपयोग कांहीवेळेला पात्रांच्या अंत:करणातील भावनांचे किंवा विचारांचे उठावदारपणे वर्णन करण्याकरताही केला जातो. उदा. " एकेकाची अखेर" या कथेमधील ही वातावरण निर्मिती पहा -

"... हलुहलु आभाळ इतके घटले की स्वयंपाकघरात गुडूप अंधार झाला, आणि पुन्हा असा मुसळधार पाऊस सुरु झालाकी ज्याचे नाव ते! गळतीखालच्या पातेल्यात पाणी कोठोकाठ साचू लागले, मग मात्र आईचा धीर सुटल्यासारखा झाला. ती एकदम माझ्याजवळ बसली आणि माझ्या डोक्यावरुन हात फिरवून पदराने डोळे पुसु लागली."

भौगोलिक .. वातावरणाने ही कथा अधिक प्रवाही, अर्थगर्भ बनली आहे, नदीकाठच्या गावात घडणारी ही कथा निसर्गवर्णनाने लक्षवेधी ठरते.

अशाच प्रकारे पात्रांच्या मनोवस्थेचे उठावदारपणे चित्रण करणारे वर्णन " अनिकेत " कथेमध्येही येते.

" तिथली कौलारे उन्हाच्या तिरिपेखाली चिडीचिप्प झाली होती. समोर दिसणाऱ्या डोंगरामागे भरुन आलेले आभाळ, आता विस्कटत होते, आणि त्या बाजूने मधूनमधून

थंड वाऱ्याचे झोत येत होते. त्या अंगाला कोठेतरी चांगला पाऊस पडत होता. खिन्न अंत:करणाने यशवंता मोटारीमागे उडत गेलेल्या धुरळयाकडे पाहात राहिला "

हे वर्णन पात्राच्या भावनेला उठावदारपणा देते. तर याच कथेतील शेवटी येणारे निसर्गवर्णन कथावस्तूचा अपरिहार्य घटक म्हणून येते.

" युधिष्ठिराचा रथ " कथेतील निसर्गही पात्रांच्या अंत:करणाची कल्पना आणून देतो. तलावाकाठच्या हिरव्यागार लुसलुशीत गवतावर विसावलेले धाकटे सरकार, आभाळातून चाललेल्या संथ टगासारख्या येणारा बिरदी कथेच्या सुरुवातीलाच भेटताव तळयात फिरणाऱ्या निरपराध बदकावर बिरदी गोळी चालवतो बदक क्षणाभर फडफडते आणि शांत होते, या वर्णनातून बिरदीच्या मनाची तडफड लक्षात येते.

बिरदी आणि धाकटे सरकार यांच्या दृष्टीने असलेला निसर्ग हा या कथेत शोभेसाठी येत नाही तर कथानकसाठी अपरिहार्य घटक म्हणून येतो.

कथेमध्ये येणाऱ्या निसर्गवर्णनातून वातावरणनिर्मिती आणि पात्रांची मनोवस्था रेखाटणे हे हेतू असतात " श्रीशिल्लक " मध्ये हे हेतू सहजपणे अविष्कृत झाले आहेत, या निसर्गवर्णनांना एक प्रकारचा नेटकेपणाही आला आहे.

" एका स्टेशनमास्तराची गोष्ट " ही कथा उन्हाळयातील एका भ्लल्या पहाटे घडलेली. त्यासाठी कथाकाराने निसर्गाची यथोचित पार्श्वभूमी निर्माण केली आहे. ' एका उन्हाळी पहाटेचे तीन, किंचित उष्मा, माशाच्या खवल्यासारख्या ढगांनी भरून गेलेले आकाश आणि चांदणे. पहाडावरचे शुष्क गवताळ पठार त्यावर इतस्तत: उगवलेल्या झुडुपांच्या वेडयावाकडया सावल्या...'

या क्रियापदाशिवाय असलेल्या वाक्यरचनेतून, नेमक्या शब्दांतून वातावरणनिर्मिती केली आहे. त्यामुळे कथेची पार्श्वभूमी म्हणून या वातावरणाचा उपयोग झालेला आहे.

" श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील वातावरणनिर्मितीचा अभ्यास केल्यानंतर कथेच्या घडणीसाठी आवश्यक असणारी वातावरणनिर्मिती घडविण्यात चिरमुलेंची लेखणी समर्थ ठरली आहे. स्थळ-काळाला अनुरुप अशा विविध वातावरणामुळे कथानकाच्या दृष्टीने अनेक हेतू साध्य झालेले आहेत. एकंदरीत कथेच्या घटकांमध्ये वातावरण निर्मितीला असलेले महत्त्व लक्षात येते.

## निवेदनशैली

कथेच्या इतर सर्व घटकांबरोबर कथेच्या निवेदन पध्दतीलाही खूप महत्त्व आहे. या निवेदन पध्दतीवरून कथेचा प्रकार ठरत असतो. कथेतील निवेदनपध्दती जर वर्णनाच्या अंगाने जात असेल तर तिला

वर्णनात्मक कथा म्हणातात. तर कथेतोल निवेदन पध्दती कथनाच्या अंगाने जात असेल तर तिला कथनात्मक कथा असे म्हणातात.

कथेतील वर्णनात्मक पध्दतीतमध्ये, कोणात्याही प्रकारच्या प्रसंगाचे किंवा घटनांचे वर्णन नसते तर अवकाशातील वर्णनाला किंवा स्थळवर्णनाला महत्व असते. कथानकाच्या विस्तारासाठी हे वर्णन आवश्यक असते. परंतु हे वर्णन करतांना कथेची गती मंद होण्याची शक्यता असते.

तर वर्णनात्मक निवेदनपध्दती पेक्षा कथनात्मक निवेदन-पध्दती ही अधिक आकर्षक असते. येथे प्रसंगाचे किंवा घटनेचे कथन केलेले असते. त्यामुळे कथेला गतीही प्राप्त होत असते.

कथानिवेदनामध्ये लेखक तृतीय पुरुषी निवेदनपध्दती, प्रथम पुरुषी किंवा पात्रात्मक निवेदन पध्दती इ.पध्दतीचा वापर करत असतो. शिवाय अनुलोम व प्रतिलोम अशाही निवेदन-पध्दतीचा लेखक वापर करतात.

तृतीय पुरुषी निवेदन पध्दतीत लेखक, कथा निवेदन करतांना स्वत: त्रयस्थाची भूमिका घेऊन तटस्थपणे निवेदन करतो. तो कथेचा निर्माता सुत्रधारच असल्याने कथेतील पात्रांना आणि प्रसंगाना मूर्त स्वरुप देण्याचा प्रयत्न करत असतो. त्याला पात्रप्रसंगापासून अलिप्त राहूनच तटस्थपणे कथेचे कथन करावे लागते. ही तटस्थता थोडीजरी ढळली तरी कथानिवेदन अयशस्वी ठरते.

लेखकाचे कथेतोल निवेदक पात्रांशी व निवेदक पात्रांचे त्याच कथेतील इतर पात्रांशी संबंध असतात. प्रत्येक कथेत एक निवेदक असतो त्याच्या दृष्टिकोनातून लेखकाची जीवनदृष्टी व

व कलाहेतू समजत असतात.

" कथेतील निवेदन पध्दतीबाबत प्रा. गंगाधर पाटील म्हणतात, " लेखक माणसाच्या कृतींचे, घटना-प्रसंगाचे निवेदन करीत असतो, तर कधी तो नदी, समुद्र, आकाश आदी निसर्ग-स्थळांचे, आकाशाचे वर्णन करीत असतो, कधी तो माणसांच्या उक्ती " संवाद ", रूपाने देत असतो, तर कधी माणसे, घटना स्थळे, जीवन यांच्या संबंधी चिंतन " भाष्य " ही करीत असतो. म्हणजेच लेखक निवेदक, निवेदन ( नॅरेशन ), वर्णन ( डिस्क्रिप्शन) भाषा-संवाद ( स्पीच-डॉयलॅाग ) भाष्य ( कॉमेंट ) या निवेदन-पध्दतीच्या चार मुलभूत प्रकारचा अवलंब कमीअधिक प्रमाणात करीत असतो" [30] या चार सुत्रांच्या आधारे " श्रीशिल्लक " आणि " कॅाग्ज " मधील कथांचा अभ्यास करावयाचा आहे.

" श्रीशिल्लक " मधील निवेदन पध्दती ही वर्णनाच्या अंगाने जाणारी आहे. कथेला आवश्यक असणा-या घटना-प्रसंगाचे वर्णन तर यामध्ये येतेच, शिवाय पात्रांच्या कृती उक्तीचे वर्णनही यामध्ये येते. काहीवेळा निवेदनामध्ये भाषा-संवादाच्या वापरामुळे कथा नाटयात्मता धारण करते या संवादातून पात्रांचे विचार-भावना व्यक्त करत त्यात त्या पात्रांचे व्यक्तिमत्वही उभे केले जाते, तर कांहीवेळा कथानकात भाष्यही येते. हे भाष्य किंवा चिंतन त्या विशिष्ट अनुभवाच्या संदर्भापुरतेच असते तर कधी सर्वव्यापी असते. त्यामुळे कथेला मुल्य प्राप्त होते.

या कथासंग्रहातील बहुतांशी कथा या तृतीय पुरुषी निवेदन-पध्दतीतून साकार झालेल्या आहेत, तर " बॅंकर-ट्रेडर-मॅनेजर" व " एकेकाची अखेर " या दोनच कथा प्रथम पुरुषी निवेदन पध्दतीतून व्यक्त झाल्या आहेत.

" श्रीशिल्लक " मधील " बँकर-ट्रेडर-मॅनेजर या कथेतील निवेदन प्रथम पुरुषी आहे. कथेच्या सुरुवातीला निवेदन वर्णनाच्या अंगाने येते परंतु संपूर्ण कथा कथनपध्दतीने साकार झालेली आहे. या कथनातून पात्रांचे व्यक्तिमत्वही उभे केले आहे. " मी " या प्रमुख पात्राच्या निवेदनातून विश्वनाथ, मृदूला, नाना सावंत या सर्वांची व्यक्तिमत्वे व्यक्त होत जातात.

विश्वनाथाने अकरा हजार रुपये मागितल्यानंतर निवेदक पात्र सावध होते, परंतु हे पैसे मागतांना विश्वनाथबद्दलचे आपले मत कथनपध्दतीने सांगतो, " त्याच्या स्वरात अजिजी, संकोच, मोकळेपणा, किंवा भाबडेपणा यांतली कोणतीही भावना नव्हती, व्यवहारही नव्हता, मित्राकडे येऊन पैसे मागण्याचा प्रेमळ हक्कही तो दाखवत नव्हता" ( पा. नं. ८७) इथे निवेदनात अलिप्तता दिसते. स्वत:पासून अलिप्त होऊन इतर पात्रांबद्दलचाही अलिप्तपणा कथनात दिसतो.

या निवेदनांतून पात्रांचे व्यक्तिमत्व उभे राहतेच पण निवेदक पात्राची तटस्थता जाणवते. विश्वनाथाने पैसे मागण्यापूर्वीचे निवेदकाचे विचार आणि नंतरचे विचार हे निवेदनातून व्यक्त होतात, कथेत घडणा-या सगळ्या घटनांच निवेदन कथन पध्दतीने येत असतांना, चिंतनही येते. 'मित्राबद्दल सदिच्छा राहिली असेल पण स्नेह आणि सदिच्छा एक नव्हेत,' असे भाष्य ही निवेदनातून येते त्यामुळे कथेला मूल्य प्राप्त होते.

" श्रीशिल्लक " ही कथा तृतीय पुरुषी निवेदनपध्दतीतून आलेली आहे. कथेची सुरुवात विश्वेश्वराच्या आगमनाने झालेली आहे. आणि शेवट त्याच्या जाण्याने म्हणजे या कथेचे मध्यवर्ती पात्र विश्वेश्वर आहे ही कथा सरस्वती या पात्राला मध्यवर्ती ... कल्पूनही झाली असती. मात्र निवेदकाला पर्यायाने लेखकाला याचे भान आहे. म्हणून संपूर्ण कथा ही वर्णनाच्या अंगाने जातांना इथे निवेदनातील तटस्थता स्पष्टपणे जाणवते.

इथे निवेदन तृतीय पुरुषी असले तरी पुढे येणाऱ्या निवेदनात प्रतिलोम पद्तीचा वापर लेखकाने केला आहे. 'ती मुग्धच राहिली, तिच्या मनात तो पाठमोरा चालतच होता. पाठमोराच हातात ट्रंक-वळकटी घेतलेला... तिच्यासह सत्यनारायणाच्या पुजेला बसणारा, भरजरी पितांबर नेसून देवीची आरती गाणारा, भाद्रपदातील पहाट खणखणीत अथर्वशीर्षाने भारुन टाकणारा. कृष्णेच्या पाण्यात ओलेत्याने प्रहरं न् जप करणारा...'या निवेदनातून सरस्वतीला पूर्वीच्या घटना आठवू लागतात.

याच कथेतील संवादातून कथेत भाष्यही निर्माण झाले आहे. उदा. सरस्वतीला विश्वेश्वर भेटतो तो प्रसंग ( पा.नं ५) तर कांहीवेळा पात्रांच्या माध्यमातून " जगांत कुणी कुणाचा गुरु होऊ शकत नाही बाबा" असे जीवनभाष्यही लेखकाने नोंदविले आहे.

" ट्रॅपीझ " या कथेचे निवेदन तृतीय पुरुषीच आहे. परंतु कथेतील वर्णनामुळे कथानायकाच्या मन:स्थितीची कल्पना येते. परीक्षा हॉलमधील वातावरण आणि त्यातील जोशीची अस्वस्थता वर्णनाने अधिक गहि-या स्वरुपात व्यक्त होते. कॉलेज आवारात जी चार वर्षे काढली. त्या वर्षातील घटना-प्रसंग त्याला खुणावू लागतात. इथेही निवेदनात प्रतिलोम पध्दतीचा वापर केलेला आहे.

उमाच्या आणि आपल्या लग्नाचे दिवास्वप्न बघतो आणि परिक्षा हॉलमध्ये दोन तास संपल्याची घंटा होते. इथे वर्तमान-भविष्य दोन्हीचेही वर्णन चपखल रीतीने वर्णनातून येते. पुढे पुन्हा जोशी समोर कुडची उभी रहाते. " मऊ रेती", नदीचे गारगार पाणी" त्याला दिसू लागते. यातून स्पर्श संवेदना जाणवतात, या सर्वामध्ये कथानायक आपली हतबलता विसरु पाहतो.

याच्या बरोबर विरोधी मन:स्थिती शितूत सरांच्या घरातील स्थलवर्णनातून साधली आहे. " डोके शांत करणारा भिंतीचा पोपटी रंग, भारदस्त सोफासेट, दोन नाजूक मोडे, पुस्तकानी भरलेली एक नक्षीदार शोकेस. सरांचे लिहिण्याचे टेबल अखंड निळी काच असलेले खिडक्यांवरचे उन्मनी पडदे. छता-तून मध्ये सोडलेला नक्षीदार सोनेरी साखळ्यांचा दिव्याचा डोम. रेडिओग्रॅम आणि त्यावर मांडलेली छोटी काश्मिरी चित्रे " या सगळ्या वर्णनातून जोशीची विरक्त अवस्था निवेदक वर्णन करतो.

या कथेमध्ये प्रतिमांचा चपखलपणे वापर केला आहे. जोशी शिरूत सरांच्या घरी बसल्यानंतर बाहेरून शकून येते. तिला जोशी नमस्कार करतो. त्यालाही ती प्रतिनमस्कार करते आणि झटकन आत निघून जाते. तेव्हा जोशीची आंधळ्याच्या थाळीत नाणे फेकावे आणि उताराने सुटत असलेली गाडी पळत जाऊन गाठावी तसे जोशीला वाटले" अशी केविलवाणी अवस्था होते. अशा प्रतिकात्मक निवेदनशैलीतून कथेला परिणामकारकता प्राप्त होते.

प्रतिकात्मक व काव्यात्म निवेदनशैलीमुळे कथागत पात्रांच्या मानसिकतेचे चित्रण करण्यात भाषा यशस्वी ठरली आहे. उदा. एखादया निर्जिव वस्तूवरून निष्कारण फिरावेत तसे तिचे डोळे जोशीवरून फिरले", " उंबरठयातून आत आलेल्या बेडकोला बाहेर लोटणाऱ्या केरसुणीसारखी ती नजर.." ( ट्रॅपीझ ); बंदा रुपयाचा, खरेखोटेपणा संशयी दुकानदाराने नाना प्रकारे पारखून घ्यावा त्याप्रकारे विविध विषयावर प्रश्नांनी विमलची पारख करण्यात येत होती-" 'साखरेच्या रव्याभोवती अकस्मात मुंग्या गोळा व्हाव्यात त्याप्रमाणे कोण कुठले अनाहूत गानलुब्ध दिवाणखान्यात तिष्ठत ऐकत राहिले" ( मारवा ); " नोकरीतला लौकिक, कविता, गाण्याच्या मैफिली पुष्कळ पुष्कळ मिळाले, पण मी हे कधी एंजॉय केलं असं मला वाटेनासच झालंय, मग मी काय संगळं ढोंग केलं ? तसंही नाही, मला वाटायला लागलंय, यशस्वी जीवन संपादन करणारा " मी" माझ्यात उपरा आहे. खरा " मी " आमच्यागावातनं बाहेर पडलाच नाही. आता तो जागा झालाय, तिथंच तो रंगाळतोय आणि या उपऱ्या " मी " ला तिकडं बोलावतोय" ( दिग्मन );

" देवाच्या उंब-यावर ल्यायो ठेकावा तसं तुळशी जखडून ठेवलयतं वाड्यावर" ( बेणं ); " तोवर सकाळ पोलिसासारखी उभी सा-या भूतकाळाला सरकफास घालून खेचून आणणारी लकेर ", पिचून पिचून एके दिवशी तडकन फुटलेली लोकांची छुपी कुजबूज, " मग षड्जाचा जोड जुळला नसतानाही दडपून गावं तसा शृंगार " ( आवर्त ); " तुमच्या " तोंडाला असलेलं प्रचंड कुलूप त्यावर डोक आपटून घेण्यात तिचं आयुष्य गेल असेल. एखादी किंमती पैठणी विरत जाऊन शेवटी तिच्या धोदोटया ठहाठ्यात तसं" " तू हसलीस ना ल्या, की मला शिलालेखाची आठवण होते, न कळणा-या लिपीतल्या शिलालेखामागं काहीतरी अजब ब्रम्हांड दडलेलं असाव त्याप्रमाणं' " धाकटया सरकारांना वाटलं, एकुणा षड्ज लागला, "( युधिष्ठिराचा रथ ); या सर्व उदाहरणांतून माणसाच्या मनाचा तळ शोधण्यांचा प्रयत्न भाषेने केला आहे, व ती त्यात यशस्वी झाली आहे. भाषेच्या तरलतेमुळे घटना-प्रसंगाच्या चित्रणाला श्रेष्ठ दर्जा प्राप्त झाला आहे.

" ते ( चिरमुले ) आपल्या भोवतालच्या स्त्री-पुरषांच्या जीवनकथा निवेदीत असल्यामुळे त्या कथांच्या निवेदनात एक प्रकारचे वृत्तीगांभीर्य आवतरते. ते निवेदन अर्थवान होते"१ ३१ असे वा. ल. कुलकर्णी यांनी आपले मत मांडले आहे.

निवेदनातून घटना-प्रसंगात व्यक्तिचित्रणाबरोबर निसर्गवर्णनाचाही सूचकतेने, आटोपशीर वापर केलेला आहे. आणि त्यातून एक प्रकारची नाट्यात्मता निर्माण झालेली आहे. शिवाय निसर्गवर्णनामुळे वातावरणाची योग्य निर्मिती साधली आहे.

" अनिकेत " ही कथा तृतीय पुरुषी निवेदनातून साकार झालेली. लहानग्या मुलाच्या, यशवंताच्या दृष्टिकोनातून सांगितलेली. परंतु निसर्गवर्णनातून त्यांच्या खिन्न मनाचे चित्रण कथाकाराने निवेदनातून केले आहे,'तिथली कौलारे उन्हाच्या तिरिपेखाली चिडोचिप्प झाली होती, समोर दिसणाऱ्या डोंगरामागे भरुन आलेले आभाळ आता विस्कटत होते. आणि त्याबाजूने मधूनमधून थंड वाऱ्याचे झोत येत होते. त्या अंगाला कोठेतरी चांगला पाऊस कोसळत होता' ( पा. नं. ७७ ) या पार्श्वभूमीवर यशवंता खिन्न अंत:करणाने घुरळयाकडे पाहात राहतो.

हाच यशवंता ज्यावेळी धर्मशाळेतील दीपमाळेवर चढून बसतो तेव्हा, तेथून त्याला आसपासची गंमत किती छान दिसत होती. " खूप लांब असलेल्या निळया डोंगररांगा, त्याच्यापुढे पसरलेली फिकट पोपटी रंगाची कुरणे, अगदी अस्पष्ट दिसणारा मोटररस्ता, हिरव्यागार आंबराया!' ( पा. नं. ८० ) या निसर्गवर्णनातून यशवंताच्या आनंदी, अवखळ मनोवृत्तीची कल्पना येते.

तर याच कथेच्या शेवटी, ' पुन्हा आभाळ गच्च दाटले होते. ओढयावर काळसर कपटी छाया नाचत होती. चिवळसर उन्हाची फक्त एक तिरीप लांब क्षितीजावर दिसत होती. लांब कुठेतरी खूप मोहोळ एकदम उठावे असा आवाज ऐकू येत होता. यशवंताच्या पोटात भीती उसळून उठली. पाणी वाहात होते त्या दिशेकडे तोंड करून तो हळूहळू तांब्या, भरु लागला. तोच तो मोहोळासारखा सों.सो.आवाज आसपासच्य शेतजमिनीत घुमवित जवळ येत चालला. यशवंताला मागे वळून पाहाण्याची फुरसत मिळाली नाही. पुरुषभर उंचीचा गढूळ पाण्याचा विक्राळ लोंढा वेगाने सरपटत आला आणि यशवंताला झोळीत झोळीत पुढे चालता झाला'( पा.नं. ८२) मोजक्या, आटोपशीर शब्दांच्या सहाय्याने यशवतांच्या मृत्यूची पार्श्वभूमी निसर्गवर्णनाने साधली आहे. या वर्णनातून मृत्यूची भीषणताही अधिक भयप्रद स्वरूपात जाणवते. कथेच्या शेवटच्या परिच्छेदातील निसर्गवर्णनही असेच भयप्रद भीषण वाटते.

" एकेकाची अखेर " या कथेतील चंद्राक्काच्या मृत्यूचे वर्णन, निसर्गवर्णनाच्या माध्यमातून अधिक भीषण स्वरूपाचे झाले आहे. ' क्षितीजापर्यंत पसरलेला, गढूळ भाख्या रंगाचा प्रचंड पाणलोट खळाळत, फेसाळत, उसळत धावत होता. अनेक कीटक, झाडेझुडपे जीवजीवाणू यांना घेऊन उन्मतपणाने शिरळत होता. क्षितिजरू-वर एकापाठोपाठ एक असे गडद काळे ढग पाण्याने भारावून

येऊन पुन्हा वर्षाव करण्यासाठी दाटत होते. त्यांच्या छाया पाण्यावर पडून देवगंगेचे पात्र अधिकच भयाण्णभासत होते. ह्या गंभीर पार्श्वभूमीवर चंद्राक्काच्या चितेतून निघणारी धुराची वेटोळी आकाशांत जाऊ लागली. रात्री परत संततधार लागली" ( पा.नं. १६६ )

कथेचे निवेदन हे डोल्या नावाच्या लहान वयाच्या पात्राने केले आहे, म्हणजे प्रथम पुरुषी निवेदनाने युक्त असलेली ही कथा. पण या निसर्गवर्णनात प्रौढता जाणवते, शिवाय पांडूच्या मृत्यूच्या प्रसंगाचे वर्णनही तटस्थपणे केलेले नाही तर त्यामध्ये निवेदकाने सर्वज्ञाचो भूमिका घेतली आहे. हे एवढया चांगल्या कथेला लागलेले गालबोट आहे. हे निसर्गवर्णन निवेदनातून येतांना कथानकाची गती मंद होते. पण निवेदनाचा दोष नाही तर ते निवेदन कथानकाला आवश्यक पुरक ठरते.

" दु:ख - कथेची सुरुवात आणि शेवट यावेळो निर्माण झालेली वातावरणनिर्मिती, निसर्गवर्णनाच्या माध्यमातून साधलेली आहे. यातून मृत्यू पावलेल्या नायकाच्या मन:स्थितीची कल्पना निसर्गवर्णनाच्या चित्रणातून साकार केली आहे.

" श्रीशिल्लक " मधोल बहुतांशी कथा या तृतीय पुरुषी निवेदनाने साकार झाल्या आहेत. ( मराठीतील बहुतांशी कथा या तृतीय पुरुषी निवेदनानेच लिहिल्या गेल्या आहेत ), पण या कथासंग्रहातील कथांना संवादाची जोड मिळाल्याने त्या कथा नाटयरूप धारण करतात. म्हणून निवेदनाचाच एक परिणामकारक विभाग म्हणून संवादांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. " धागे " या कथेचे निवेदन तृतीय पुरुषी आहे, परंतु संवादाने या कथेला

नाटयरूप मिळाले. आहे या संदर्भात वा. ल. कुलकर्णी म्हणतात, "ह्या ( धागे ) कथेचे निवेदन अशा प्रकारे होते आहे की ती ऐकतांना आपल्या गालांवर स्मित निर्माण होत असतानांच आपण ह्या वरवर पाहाता अर्थशून्य भासणा-या स्त्री-पुरुष व्यवहाराचा अर्थ लावू लागतो"[३२]

संवादातून फुलणारे कथानक म्हणून " एका स्टेशनमास्त-राची गोष्ट " या कथेचा विचार करता येईल. कथेच्या सुरुवातीला येणारा स्टेशनमास्तर व पोर्टर रेहमान यांच्यातल्या संवाद, चुकून उतरलेल्या आजारी डॉक्टर व त्यांची पत्नी या उभयंतांचा संवाद, पत्नीच्या अवघडल्यावेळी धीर देणा-या विदयाच्या तोंडचा संवाद, कथेच्या शेवटी येणारा आजारी डॅाक्टर व पत्नी विदया यांच्यातला संवाद ( पा. नं.१०६) हे सर्व संवाद इतके परिणामकारक आहेत की संपूर्ण कथा नाटयरूप धारण करते

" श्रीशिल्लक " मधील निवेदनपध्दती ही सरळसाधी अशीच आहे, " आवर्त " कथेत मात्र निवेदनपध्दत इतर कथांहून वेगळी आहे. कथानिवेदन तृतीय पुरुषी आहे, परंतु निवेदक पात्र आणि कथानायिका यांच्यात विलक्षण साम्य आहे, इतके की ही कथा जणू आत्मकथाच वाटते.

" सा-यानीच चालवलेला आत्म्याचा शोध तास न तास ग्रंथालयात वाचनात गढलेले, दातांतल्या कोशातले परांजपे सर , दररोज तीनदा महिम्नस्तोत्र म्हणणारे नि ऐन पावसाळयात

सुध्दा भीमाशंकराच्या वाऱ्या करणारे बाबा. वर्षानुवर्षे तुळशीला पाणी घालीत प्रदक्षिणा करणारी आई, संथ आखीव आयुष्याला भाग देत देत धावलेली एक मुलगी. बाकी शून्य " ( पा. नं.१७१) कथानायिकेच्या स्मृतीकोषात लपलेले कांही क्षण या निवेदनातून येतात. ही निवेदनाची शैली इतर कथांपेक्षा वेगळी आहे. प्रदीप नेरुरकर म्हणतात, " आवर्त" या कथेत आवर्तासारख्या स्मृतीचा पट विणतांना धावती, त्रोटक, सूचक, काव्यात्म लय असलेली चिरमुल्यांची शैली जी.ए कुलकर्ण्यांची आठवण करुन देते "[३३] या कथानिवेदनाचा अभ्यास करतांना हे मत योग्य वाटते.

" श्री शिल्लक " या कथासंग्रहातील निवेदन पात्राच्या वय, लिंग, व्यवसायानुसार बदलणारे आहे. पात्रानुसार विचार भावना, भाषाशैली यामध्ये बदल होत जातो. त्यामुळे ही निवेदनशैली कथेचे सौंदर्यमूल्य वाढवण्यात यशस्वी झाली आहे.

कांहीवेळा पात्रांच्या माध्यमातून लेखक चिंतन करतो आणि या चिंतनातून तो भाष्यही करत असतो. कथानकात येणाऱ्या या चिंतनामुळे कथानकाची गती मंदावते पण ती कथावस्तूला बाधक ठरत नाही. या चिंतनातून जेव्हा भाष्य येते तेव्हा कथेला वरचा दर्जा प्राप्त होतो व लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोनही त्यामधून प्रतित होतो. अशा प्रकारचे चिंतन व भाष्य " श्री शिल्लक " मध्ये अनेक कथांत येते.

उदा. " प्राक्तन आहे ते भोगलच पाहिजे", " जगात कुणी कुणाचा गुरु होऊ शकत नाही बाबा" ( श्रीशिल्लक ); " प्रत्येकजण कुठपर्यंत जाऊ शकेल, याच्या कक्षा ठरलेल्या असतात", " समर्पण नको, पण समर्पणापेक्षाही मिळणारं श्रेय जमलं तर हवं अशी अवस्था झालीय आमची, ( दि मर्मन ); " असंख्य माणसे-असंख्य व्यापार, असंख्य जन्म, असंख्य मृत्यू, आपण कोण ? कसले आपले दुःख ? " पण प्रत्येक दुःखाला कारण तयार केलं पाहिजे असं आहे का ?" ( दुःख ); " खरोखर माणसाची ही जात मोठी विलक्षण आहे. केवळ कष्ट उपसण्यापलीकडे ज्यांना दुसरा धर्म माहीत नाही आणि याशिवाय ज्यांना दुसरीकडे यत्किंचितही संतोष वाटत नाही अशी ही माणसे चार गोड शब्दांना पारखी झाली तरी आपल्या हातून चार माणसांचे थोडेफार भले केल्याखेरीज ती स्वस्थ बसत नाहीत, " ईश्वर अशी दुर्दैवी माणसे जन्माला का घालतो" ( एकेकाची अखेर ); " नियती कुणाचं अन्नोदक कुठं निश्चित करेल हे सांगता येत नाही" ( आला क्षण गेला क्षण सारे क्षण मृत्यूचे . त्यानेच दिलेले, त्यानच टिपलेले ); " खरोखरच कशाची कशाला संगती आहे ? येणाऱ्या प्रत्येक क्षणाला जे घडत असतं, त्याचा एकमेकाशी काय ऋणानुबंध असतो ? ( आवर्त ); 'देहाच्या आसक्ती पलिकडची माया अनुभवल्यावाचून देहाच्या अभिलाषेलाही काही अर्थ येत नाही, " एखाद्याच्या मनांत कसलीही किल्मिषं राहाणं किंवा जाणं याबद्दल दुसरा काही करु शकत नाही" ( युधिष्ठिराचा रथ ) इ. अनेक प्रकारे निवेदनातून लेखकाने भाष्य केले आहे. त्यामुळे कथेला कलात्मक मूल्य तर लाभतेच पण

त्याबरोबर कथामूल्यही वाढते.

अशाप्रकारे " श्रीशिल्लक " मधील निवेदन हे वर्णनाच्या अंगाने जातांना, सूक्ष्म, वस्तुनिष्ठ वर्णनाबरोबर पात्रांच्या मन:स्थितीचेही वर्णन येते. भाष्य-संवादातून कथेत नाट्य निर्माण होते तर निवेदनातून जे भाष्य केले जाते त्यातून कथेला मूल्य तर प्राप्त होतेच शिवाय लेखकाचा जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोनही समजतो. एकंदरीत चिरमुले यांची " श्री-शिल्लक " मधील निवेदनशैली प्रौढ, गंभीर, सकस असल्याचे जाणवते.

## भाषाशैली :

ललित साहित्यकृतींचा अभ्यास करतांना भाषा आणि शैली दृष्टया अभ्यास हा अपरिहार्य ठरतो. कारण भाषेच्या माध्यमातून कथेचा आशय अधिक परिणामकारक ठरतो. भाषेचा असा परिणाम साधण्यासाठी लेखक स्वत:ची अशी एक शैली निर्माण करतो. किंबहुना तो जे लिहितो त्यातून त्याची स्वतःची खास शैली अभिव्यक्त होत असते.

कथेतील भाषा ही अनेक प्रकारचे कार्य करत असते. विविध भावनांचे आदान-प्रदान करणे, भावनांचे प्रगटन करणे, पात्रांचे व्यक्तिमत्व साकार करणे, विविध संदर्भ देणे इ.अनेक प्रकारचे कार्य कथेतील भाषा करत असते. " श्रीशिल्लक " मध्ये भाषेने कोणकोणत्या प्रकारचे कार्य केले आहे, हे अभ्यासावयाचे आहे.

" श्रीशिल्लक " कथासंग्रहाच्या अभ्यास करतांना एक गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे या कथा मध्यमवर्गीयाचे भावविश्व अधिक समर्थपणे व्यक्त करतात. हे भावविश्व अभिव्यक्त होतांना, या भावविश्वानुसारच ही भाषा आपले रुप धारण करते.

या कथासंग्रहातील " श्रीशिल्लक " या कथेमध्ये सरस्वतीच्या मनाची अवस्था एकाच वाक्यात अविष्कृत करतांना, 'मोहोळ उठावे त्याप्रमाणे शेकडो आठवणी तिच्या कानांत गुणगुणू लागल्या", अशी अर्थगर्भ आणि प्रतिकात्मक भाषा " श्रीशिल्लक " मध्ये ठिकठिकाणी दिसते.

" एखादया निर्जिव वस्तूवरुन निष्कारण फिरावेत तसे तिचे डोळे जोशीवरुन फिरले, " अवर्षणामुळे देशांतराला निघालेल्या गावामागे खुरडत येणा-या लंगडयासारखी जोशीची दशा झाली, " आंधळयांच्या थाळीत नाणे फेकावे आणि उताराने सुटत असलेली गाडी पळत जाऊन गाठावी तसे जोशीला वाटले' ( ट्रॅपीझ ); " पाण्यात दूध मिसळावे इतक्या सहजतेने गुरुनाथ दिवाणखान्यातल्या वातावरणांशी एक होऊन गेला', " साखरेच्या रव्याभोवती अकस्मात मुंग्या गोळा व्हाव्यात त्याप्रमाणे कोण कुठले अनाहूत गाणलुब्ध दिवाणखान्यात खिळून ऐकत असले". ( मारवा );" आपल्या वात्सल्याला पक्षघात झाल्याचे त्याला आढळून येते" ( दुःख ); " देवाच्या उंब-यावर रुपाया ठोकावा तसं तुम्ही जखडून ठेवलंयत इथं वाडयावर ( बेणं ); " चेह-यावर भुकेजलेलं केविलवाणं, वैराग्य, " आमचं गाणं शिवधनुष्यासारखं, " लग्नानंतर एका महिन्यात

नवरा विमान-अपघातात ठार पण आता परमार्थाच्या या भातुकलीत किती गाढ रमलेली!' ( आवर्त ) इ. उदाहरणांमधून अर्थगर्भता आणि प्रतिकात्मकता यांचा एकत्रट प्रत्यय देणारी भाषाशैली दिसते. यासंदर्भात प्रभाकर पाध्ये म्हणतात, 'ही शैली इतकी अर्थगर्भ आणि इतकी चित्ररम्य आहे म्हणूनच ती त्यांचे कसदार विषय, कसदार व्यक्ती आणि कसदार प्रसंग यांची समर्थ बंदीश बांधू शकते'[३४]

श्री. चिरमुलेंना संगीताची चांगली जाण आहे. त्यामुळे संगीताचा संदर्भ कथेत आल्यानंतर, भाषेलाही ते संगीताची लय देतांना दिसतात, किंबहुना सुरांना शब्दांत बांधण्याचा ते प्रयत्न करतात आणि त्यांची भाषा अधिक समर्थ होते. त्यामुळे भाषेवर संगीताची छाप पडलेली आहे. उदा." मारवा" " आवर्त " या कथांतून ही संगीतमय भाषा आढळते, " मारवा या कथेत " मारवा " रागाचे वैशिष्टय व्यक्त करतांना गुरुनाथ म्हणतो, " मारवा असा सहजासहजी हातात गवसणारा राग नाही. फार विरक्त आणि लहरी" ( पा. नं. ४६ ) हे वैशिष्टय गुरुनाथाच्या व्यक्तिमत्वालाही लागू पडते. गुरुनाथ " मारवा " गायला सुरुवात करतो.'...मनुष्यवस्तीपासून दूरवर एकीकडे असलेले काळया पाषाणांचे जीर्ण शिवालय, उध्वस्त होत चाललेल्या भिंती अन् त्यातून उगवलेले, वाऱ्याने डुलणारे पिवळे पांढरे गवत, निवाऱ्यासाठी सुर्यास्ताच्या सुमारास तेथे थांबून राहिलेला अज्ञात पांथस्थ. हेमांडपंथी गाभाऱ्यातला ओलसर दर्प अन् तुटलेली कोळीष्टके, कोण्णीतरी, केव्हातरी मांडलेली तीन दगडांची चूल, त्यांतली रक्षा, बाहेर संधिप्रकाशात धूसर होत चाललेल्या आकाशाचा घुमट...'( पा. नं.४७ )

अशा भाषेतून, " मारवा " गातांना निर्माण होणारी सुरांची आवर्तनं शब्दांत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. तर संगीतातल्या रागाचो आणि हिमालयाच्या शिखरांची तुलना करतांना, " गंधार-निषादांचो शिखरं दिसतात, पण द-याखो-या धुंडाळायला जीव ओवाळून टाकावा लागतो, हिमालयाचं वैभव पाहून डोकं झुकतं. अहंकार गळतो, तुझ गाणं असं वासनारहित कर. सुरांना जिंकण्याचा उन्मतपणा दाखवू नको. त्याच्याशी जाणकारीनं वाग..." ( पा. नं. ४८ ) अशा मोजक्या शब्दांत व्यक्त होते.

गुरुनाथं हे व्यक्तिमत्व भाषेच्या ( आणि शीर्षकाच्याही ) माध्यमातून मोजक्या शब्दांत व्यक्त झाले आहे. " मारवा" जसा सहजासहजो हातात गवसणारा राग नाही तसाच गुरुनाथची विरक्त आणि लहरी, कथेच्या शेवटी, " भावजींच्या या बेदरटपणाला काय म्हणांव ?" वहिनीसाहेब दारात येऊन म्हणात होत्या, - " पाहा एकदा न्हाणीघरात नोटांच पुडकं विसरुन गेलेत", या ठिकाणी योगायोगानं सापडलेला गुरुनाथ अचानकपणो-मारव्यासारखा ! — निसटून जातो. या भाषेतून गुरुनाथचे व्यक्तिमत्व यथार्थ स्वरुपात व्यक्त होते.

तर " आवर्त " कथेतील भाषा अर्थपूर्ण आहे. या कथेतील भाषा, विरोधलय साधते. उदा. पहा " वसंतमुखारी । काळयाशार आभाळातून झिरपणा-या चांदण्या शोधीत जाणारा प्रवाहात उभा राहून अर्घ्य देणा-या तेजःपुंज ऋषीसारखा त्यातला गंधार...उजाडलेली पहाट आणि अंधारलेली खोली. रस्त्यावरच्या दिव्याची तिरीप खिडकीतून येऊन त्याच्या तंबो-यावर विसावलेली हा सैरभैर होऊन स्वरांचा वेध घेत राहिलेला. मध्यरात्रीपर्यंत

स्टुडियोतलं भाडोत्री काम, तांबारलेले डोळे आणि अवघडलेली पाठ. अवघ्या देहाला व्यापून टाकणारा थकवा. कधीतरी एवढ्याशा ब्रँडीन पोटात आणलेली उब, समजण्यासारखी क्षम्य" ( पा. नं. १७४ ) या उदाहरणांतून एका बाजूला त्याच्या आवाजाची किमया आणि दुस-या बाजूला विलक्षण दारिद्र्य. हा विरोधालय अर्थपूर्ण भाषेतून साधला आहे. अशा मोजक्या शब्दांतून हे वर्णन येते. कथाकाराची ही शैली वैशिष्ट्यपूर्ण आहे.

या कथेतील लयबद्ध भाषेतून घटनेचा पात्रांवर होणारा परिणाम व्यक्त झालेला आहे."...हातात पुजेचं तबक घेऊन अर्धमिटल्या डोळ्यांनी देवघरांतून बाहेर पडतां पडता " तुजवीण शंभो मज कोण तारी " म्हणणारे बाबा. गोरेपान, पीतांबर नेसलेले...ती दुर्दैवी दुपार, देवापुढल्या चौरंगावर आईनं धडधडा आपटून घेतलेलं कपाळ, मन:स्तापानं बाबानांना आलेला अपस्माराचा झटका आणि ओटीच्या कोप-यात भयभयीत होऊन दाटीनं उभी राहिलेली धाकटी भावंड शेजारपाजा-यांनी घेतलेला साकव, जिज्ञासू कानोसा, ( छे:! लज्जास्पद )" ( पा. नं. १७१ ) इथे वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात कथेतील भाषा यशस्वी ठरलेली आहे.

" आवर्त " मधील भाषा अविष्काराचेही कार्य करतांना दिसते. पात्रांच्या भाव-भावना, मन:स्थिती अविष्कृत करण्याचे कार्यही ही भाषा करते. " त्याचे दैवी स्वर फुलायला हे पाशवी इंधन, की दोहोंच अद्वैतचं १ मग कुडी फोडू पाहाणा-या आत्म्याप्रमाणं स्वर कुठल्या बंधनातून बाहेर पडू पाहतात १ एका देहातलं सारं अलौकिक समूर्त व्हायला दुस-या देहानं सगळं

चैतन्य निर्जिव केल पाहिजे, १ अलौकिक अलौकिकाला फुलवंत . अलौकिकचं अलौकिकाला विझवंत" ( पा. नं. १७४ ) या भाषेतून नायिकेने स्वत:च्या जीवनात घडलेल्या घटनांविषयीचे केलेले चिंतन येतेआणि तिचे दु:ख अर्थपूर्णरीतीने शब्दरूप घेते.

चार-दोन वाक्यांत चित्र उभे करण्याचे सामर्थ्य चिरमुलेंच्या भाषाशैलीत आहे. उदा. " श्रीशिल्लक " मध्ये सरस्वती विश्वेश्वराला पाठमोरा जातांना पाहते तिच्या मनांत तो पाठमोराच चालत असतो. आणि चालता चालता असा साकारतो, " तिच्यासह सत्यनारायणाच्या पुजेला बसणारा, भरजरी पितांबर नेसून देवीची आरती गाणारा, भाद्रपदातील पहाट खणाखणीत अर्धवशीर्षाने भारून टाकणारा. कृष्णेच्या पाण्यात ओलेत्याने प्रहर न् प्रहर जप करणारा...स्वाहाकाराचे होतेपण तेज:पुंज मुद्रेने पार पाडणारा आणि ..." ( पा. नं. १ ) या भाषेतून विश्वेश्वर डोळ्यासमोर डोळ्यासमोर उभा राहतो, तर " ट्रॅपीझ" कथेत, " एकूण उमेदवार शंभर, शंभर उमेदवारांच्या पाच लांब रांगा तहानलेल्या, घामजलेल्या, डेस्कपर्यंत माना झुकवून कागदावर टाकांची अविरत क्वायत करणा-या, कुणी जीभ बाहेर काढून, कुणी ओठ आवळून, कणी अर्धवट डोळे मिटून स्फिंक्ससारख्या चेह-याने, हात मोजे बांधून, संथपणाने फिरणारे पर्यवेक्षक पुरवणी मागण्यासाठी वाजणारे टाकांचे टकटक आवाज...( पा, नं.१९) परीक्षा हॅालमधील प्रसंगाचे वर्णन नेटकेपणाने झाले आहे. या भाषेतून चित्रपटाप्रमाणे प्रसंगाला गतिमानता प्राप्त होते.

चिरमुल्यांची भाषा कधीकधी विलक्षण उपरोधी बनते. " दि मर्मन " कथेत म्युंझिक सेंटरमधील सतारवादनाचे वर्णन उपरोधाने कसे केले आहे ते पाहाण्यासारखे आहे- " पुढच्या रांगांवर कडक गळेबंद कोटांचे, प्रशस्त टक्लांचे, अजंठा केशरचनेच पेचदार हास्याचे, काश्मिरी साड्यांचे निम्मेअधिक प्रतिष्ठित सचिवालय मख्खपणाने बसून होते, आणि दगडी भिंतीवर टकरा घ्याव्यात त्याप्रमाणे सतारिया घामाने निथळून जाई-पर्यंत आपल्या कारागिरीची व्यर्थ कोशीस करीत होता" ( पा.नं. १११ )

" श्रीशिल्लक " मध्ये चिरमुले काहीवेळा क्रियापदाचा वापर करत नाहीत. त्यामुळे निवेदन काव्यात्म होते. उदा. " एका उन्हाळी पहाटेचे तीन, किंचित उष्मा, माश्याच्या खवल्यासारख्या ढगांनी भरुन गेलेले आकाश क्षीण चांदणे पहाडावरचे शुष्क गवताळ पठार, त्यावर इतस्तत: उगवलेल्या झुडुपांच्या वेड्यावाकड्या सावल्या, निस्तब्ध फलाट, त्यासमोरुन सरळ गेलेली आणि दूरवर एका टेकडीमागे लुप्त झालेली रुळांची जोडी. पलिकडे चार पोलादी खांबावर उभी राहिलेली पाण्याची टाकी, कळणावर लुकलुकणारे तांबडे हिरवे दिवे. त्यापलीकडे हात आडवा करुन उभा राहिलेला सिग्नल. वाऱ्याने होणारी सिग्नलच्या तारांची सळसळ नि नजिकच्या दरीतून उचंबळून येणारे चित्रविचित्र आवाज, ( पा. नं. १७१ ) किंवा " आवर्त " कथेत " चौकातले रस्ते एकमेकाच्या मिठीत नि:स्तब्ध. काळया भुरक्या निर्जीव इमारती ओठंगून उभ्या, झाडांच्या अंधाऱ्या पानापानांतून संथ वाऱ्याची झुळूक नारळीच्या दोन उंच झाडांमधून वर उमटलेल्या अलिशान

मंडपाचा लखलखीत कोपरा लालभडक छत, पताका आणि विजेच्या नळया ( पा. नं.१६८ ) हा " आवर्त " कथेतील उतारा याच प्रकारचा आहे. क्रियापदविरहीत वाक्यरचनेमुळे भाषेला कवितेचे रूप आलेले आहे.

एखाद्या स्थळवर्णनातून निसर्गाला जीवंतरूप प्राप्त झाले आहे. उदा पहा- " तलावाकाळच्या हिरव्यागार लुसलुसशीत गवतावर डोक्याखाली हात घेऊन धाकटे सरकार विसावलेले होते. संथ चालीने क्षितीजापार होत जाणा-या ढगांवर त्यांची नजर फिर होती. बाजूला बंदूक अस्ताव्यस्त पडलेली समोर लालसर पाण्याने तुडूंब भरलेला तलाव, तक्तकोत हिरव्या पानांचा भार डोकीवर घेऊन तलावाच्या काठाने पाण्यावर ओठंगलेली झाडे, हिरवळीवरून हळुहळू सरकरणारे उन्हाचे गोड कवडसे, ( पा. नं. १८० ) या वर्णनातून निसर्गा बरोबर धाकट्या सरकारांच्या मनःस्थितीचे दर्शन घडविणारी अचेतनाला सचेतन करणारी भाषा येते.

अशाच प्रकारचे " ट्रॅपीझ " या कथेतील स्थळवर्णन पाहाण्यासारखे आहे. " डोके शांत करणारा भिंतीचा पोपटी रंग, भारदस्त सोफासेट. दोन नाजूक मोडे. पुस्तकांनी भरलेली एक नखरेल शोकेस, सरांचे लिहिण्याचे टेबल, अखंड निळी काच असलेले खिडक्यांवरचे उन्मनी पडदे, ( पा. नं. २७) या वर्णनातून पात्राच्या भावस्थितीची कल्पना येते. डोके शांत करणारा पोपटी रंग, नखरेल शोकेस, उन्मनी पडदे इ.

विशेषणातून या कथानायकाच्या भावविश्वाची कल्पना येते.

सूचकता हे भाषेचे महत्वाचे वैशिष्टय आहे. सूचक भाषाशैलीमुळे कथेला भारदास्तपणा येत असतो. अशी सूचक भाषाशैली " युधिष्ठिराचा रथ " या कथेत आढळते - 'लबाड कोल्हा। दलदलितंन जाताना एक एक पाऊल जपून टाकाव तसा माझ्याशी बोलत होता. होकार घालणारी माणसं शांत झोपलेल्या रानात चोरपावलांनी शिरतात. बिनबोभाट सावज घेरतात आणि एकाएकी आरडाओरडा करून सावलाला माळयाखाली आणून सोडतात, असं काहीसं होतयं, ( पा. नं. १८२ ) बिरदीला कर्नाटकाच्या जहागिरीवर पाठवण्याचे निश्चित झाले होते मात्र बिरदीला ही बातमी सरकारस्वारीच्या पी. ए. ने सांगितली त्याचे वर्णन अत्यंत मोजक्या शब्दांत, सूचक शैलीत आले आहे.

" श्रीशिल्लक " कथासंग्रहातील कथांमधील निसर्गवर्णने ही कथेला सौंदर्य प्राप्त करून देणारी आहेत " ट्रॅपीझ " कथेची सुरूवात ही निसर्गवर्णनाने झालेली आहे. दोन संत्री आपली रात्रपाळीची ड्युटी करतात. " कोण हा थंडीचा कडाका ! " " फारच भयंकर " किंवा " चंद्र मावळतीकडे झुकलाय" या वर्णनातून " स्पर्श संवेदना " आणि " दृश्य संवेदना " व्यक्त होतात. रात्रीच्या वातावरणाचे वर्णन सुरेख शब्दांत शब्दांकित केले आहे. " अनिकेत " कथेतील शेवटचे निसर्गवर्णन अशाच मोजक्या शब्दांतून व्यक्त झाले आहे. भाषेला पसरटपणा न देता, कमीत कमी शब्दांतून वर्णन करण्यांत चिरमुले यशस्वी झाले

आलेत. हे त्यांच्या भाषेचे एक महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

" चिरमुले यांच्या " श्रीशिल्लक " कथासंग्रहामध्ये विशिष्ट सांस्कृतिक वातावरण आढळते. तसेच त्यांचा संस्कृत भाषेशी असलेला संबंध जाणवतो, " श्रीशिल्लक " मध्ये स्वाहाकार, संध्याजप, गंगार्पण, उदक, प्राक्तन, व्रतस्थ म्लान, अनिकेत, शुश्रूषा, समर्पण, श्रेय यांसारख्या शब्दाची चिरमुलेंची भाषाशैली संपन्न झाली आहे.

संस्कृत भाषेप्रमाणे इंग्रजी शब्दांच्या वापरामुळेही भाषेला सौंदर्य प्राप्त झाले आहे. ट्रॅपीझ, पोलाइटनेस, अपेंडिक्शन, मर्मन, डेकोरेटिव्हज्, डॉलेक्टस्, लिंग्विस्टिक्स अॅनॉनिमिटी, क्वाएटयूड इ. इंग्रजी शब्दांमुळे भाषेला संदर्भ-संपन्नता लाभलेली आहे.

कथेमध्ये येणाऱ्या विशेषणांनीही भाषा सौंदर्यसंपन्न बनली आहे. कथेत येणारी ही विशेषणे शैलीच्या ओघात सहज येतात. कोणत्याही प्रकारची कृत्रिमता त्यामध्ये येत नाही. उदा. कनवाळू सावली, उन्मनी पडदे, काळा पाषाण, पिवळेपांढरे गवत, ओलसर दर्प, लालसर काळाप्रकाश, क्षीण चांदणे, निस्त:ब्ध फलाट, खारकेसारखी बोटे, टिपूर चांदणे, निस्तब्ध दारं, भन्नाट नक्षत्र, ऋषीसारखा गंधार, पोलिसासारखी सकाळ, लुसलुशीत गवत, बिनचेहऱ्याची माणसं इ. विशेषणांनी ही भाषा सौंदर्यवती झालेली आहे.

पात्रांना अनुरूप अशा भाषेचा प्रत्यय येतो, ही सगळी पात्रे मध्यमवर्गातून आणि विशिष्ट अशा सांस्कृतिक वातावरणातून आलेली आहेत त्यामुळे त्यांच्या वय-वृत्ती, प्रवृत्ती, नुसार ही भाषा अवतरते, संस्कृत आणि इंग्रजीच्या वापरामुळे भाषा प्रौढ, प्रगल्भ वाटते. पात्रांच्या भावविश्व, विचार, चिंतन आणि त्या त्या पात्रांचे व्यक्तिमत्व डोळयापुढे साकार करणारी भाषा अधिक अर्थगर्भ झालेली आहे.

प्रत्येकाच्या आयुष्याची एक एक धुनी तुम्ही पेटवून ठेवलीत " म्हणणारा विश्वेश्वर, " जगात कुणी कुणांचा गुरु होऊ शकत नाही बाबा" म्हणणारे स्वामी, स्वत:च्या उन्नतीचे श्रेय दुस-याला देणारे आणि लगेचच " स्वत:च्या उन्नतीचे श्रेय मनुष्य दुस-याला का देऊ करीत असतो" अशी शंकाही घेणारे नानासाहेब, मित्राबद्दल " सदिच्छा राहिली असेल पण स्नेह आणि सदिच्छा एक नव्हेत, " म्हणणारा बँकर-ट्रेडर-मॅनेजर मधला " मी " ॲनॉनिमिटी ॲण्ड क्वाएटयूड चा विचार करणारे भाईजी, " आपल्या वात्सल्याला पक्षघात झाल्याचे" आढळून आलेला " दु:ख " मधला " तो " "पूर्णब्रम्ह तोची अवतरला खास । अज्ञानी जीवास विपरित हा भास" असे खणखणीत आवाजात गाणारे धाकटे मालक, स्वत:च्याच जगण्याचा अर्थ लावू पाहाणारे धाकटे सरकार, बिरदी, ही सगळी पात्रे एका विशिष्ट सांस्कृतिक वातावरणातून आलेली आहेत, ही सांस्कृतिकता व्यक्त करणारी चिरमुलेंची भाषाशैली प्रगल्भ आणि समर्थ वाटते.

" श्रीशिल्लक " मधील स्त्री पात्रेही अशा विशिष्ट सांस्कृतिक वातावरणातून आलेली विचारगर्भ, चिंतनशील संस्कारशील आणि संस्कृती जपणारी अशीच आहेत. निमूटपणे दानाचा विषय झालेली " गोपालकृष्ण दाखविल ती वाट " म्हणणारी सरस्वती. " सृष्टीच्या एवढया मोठया पसाऱ्यात आपण आणि आपले पोर एवढीच आहोत" असे म्हणणारी " अनिकेत " मधील सीता, " तू मला क्षमा केली पाहिजेस" असं आजारी पतीला म्हणणारी विदया, " देवानं, किती किती म्हणून करायला जग आपल्यापुढं ठेवलयं, असं जीवनभाष्य करणारी सुदक्षणा, " तुझं दुःख तू नीट पारखून घे " असं सांत्वन करणारी तारा, वैभवशालीभूतकाळ आणि वास्तव यांच्या द्वंद्वात फेऱ्या मारणारी राधाआजी, खरोखरच कशाची कशाला संगती आहे ? येणाऱ्या प्रत्येक क्षणाला जे घडतं असतं त्यांचा एकमेकांशी काय ऋणानुबंध असतो ? म्हणणारी जीवनातील घटनेच्या आवर्तनात सापडलेली तत्वज्ञानाची विद्यार्थिनी इ. सगळी स्त्री पात्रे वेगवेगळया सांस्कृतिकतेतून वेगवेगळया अनुभवविश्वातून आलेली आहेत. त्यांना साकार करणारी ही भाषा संस्कारशील, चिंतनशील आणि त्या त्या पात्रांचे व्यक्तिमत्व उभी करणारी अशी आहे.

चिरमुल्यांची भाषाशैली अशी विविध कार्य करतांना भाषेची लयबद्धताही जाणवते " धागे " " आवर्त " या दोनही कथा काव्यात्म झाल्या आहेत तर " युधिष्ठिराचा

रथ " मध्ये, "रूपा, माझ्या कपाळावर नुसता हात ठेव " बिरदी म्हणाला. डोळे मिटून तो रूपाच्या मांडीवर डोके ठेवून पडला होता. " मला कधी कुणी थोपटल्याचं आठवत नाही. " त्याच्या मिटलेल्या डोळयांतून थोडेसे पाणी ओघळले, या संवाद निवेदनातून बिरदीच्या अंत:करणांत असलेली मायेची ओढ, त्याचे एकाकीपण कळते. अशाच प्रकारचा संवाद सरस्वती विश्वेश्वर यांच्यातही दिसतो. या संवाद निवेदनातून भाषेने भावनात्मक कार्य साधल्याचे दिसते.

" श्रीशिल्लक " मध्ये बोलीभाषेचा वापर अपवादात्मक एका कथेत दिसतो. एका स्टेशनमास्तराची गोष्ट" मध्ये पोर्टर रेहमान म्हणतो, " चला साहेब, गाडीचा टायम झाला, मला घंटी दयायला नगं का ? " आणि चालता चालता तो म्हणतो, " आजचा घाणा लई फर्मास निघालाय बघा आज तरी घेणार का थोडी ? इकडं डोंगरकपारीला अस्सल मिळती ते बघाच एकदा तुम्ही साहेब! " ( पा. नं. १०२ ) हे एकच पात्रच बोली भाषेत बोलते. अन्यथा सगळया कथासंग्रहामध्ये प्रमाणभाषाच दिसते. अर्थात या कथासंग्रहातील जवळ जवळ सर्वच पात्रे ही मध्यमवर्गीय उच्च संस्कृतीतून आल्यामुळे भाषा ही पात्रांप्रमाणे रुप घेणारीच आहे.

" श्रीशिल्लक " मध्ये वाक्यप्रचारांचा फारसा उपयोग आढळत नाही. परंतु वाक्याच्या अनुषंगाने कांही वाक्यप्रचार भाषेच्या ओघांत येतात. आणि अर्थवाही, सौंदर्यवाही होतात. उदा. मोहोळ उठणे, ब्रम्हांड गोळा उडणे, आयुष्याची

धुनी पेटवणे , पराचा कावळा करणे, उंटावरुन शेळ्या हांकणे, हरिजागर करणे, पड्ज लागणे इ.

अशाप्रकारे " श्रीशिल्लक " या कथासंग्रहातील भाषेचा अभ्यास करतांना, भाषेने केलेली अनेक कार्ये दिसून येतात. विशेषत: पात्रांचे व्यक्तिमत्व साकार करणे, अविष्कार करणे, इ. विविध कार्ये ही भाषा साधते. आणि कथेला सौंदर्यात्मक मूल्य प्राप्त होते.

अनुभवविश्व

कोणताही लेखक जरी कलात्मक निर्मिती करत असला तरी त्या कलात्मक निर्मितीमध्ये त्याच्या जीवनानुभवांना अत्यंत महत्वाचे स्थान असते. त्यांनी जे अनुभवले जगले, पाहिले तेच ते लिहीत असतात, सभोवतालचे वातावरण, संस्कार यातून लेखकाची लेखणी घडत असते. त्यातूनच त्याचे अनुभवविश्व साकारताना दिसते.

जीवनातले एखादे नाट्य पकडून त्याला कलेमध्ये बध्द करण्याचे सामर्थ्य लेखकाजवळ असते. त्यादृष्टीने लेखक आपल्या साहित्यातून " जीवनदर्शन " घडवित असतो. प्रत्येकाचे जीवनाकडे पाहाण्याचे दृष्टीकोन ठरलेले असतात. तात्वीक, मूल्यांचाही पुरस्कार लेखक आपल्या कलाकृतीतून करत असतात. या सर्व व्यवहारातून लेखक आपले अनुभवविश्व व जीवनविषयक नैतिक मूल्ये यांचा पुरस्कार साकार करत असतो, यातूनच त्याचे अनुभवविश्व

साकारतांना दिसते.

जीवनातले एखादे नाटय पकडून त्याला कलेमध्ये बध्द करण्याचे सामर्थ्य लेखकाजवळ असते. त्यादृष्टीने लेखक आपल्या साहित्यातून " जीवनदर्शन " घडवित असतो. प्रत्येकाचे जीवनाकडे पाहाण्याचे दृष्टीकोन ठरलेले असतात. तात्विक मूल्यांचाही पुरस्कार लेखक आपल्या कलाकृतीतून करत असतात. या सर्व व्यवहारातून लेखक आपले अनुभवविश्व व जीवनविषयक नैतिक मूल्ये यांचा पुरस्कार साकार करत असतो. यातूनच त्याचे अनुभवविश्व आकाराला येत असते.

" श्रीशिल्लक " मधील कथासंग्रहातील कथांतून लेखकाचे अनुभवविश्व पाहतांना चिरमुले माणसाच्या व्यवहाराचा अर्थ गांभीर्याने शोधतांना दिसतात. आणि प्रामुख्याने माणसाचाच विलक्षण शोध घेतात. वरवर पाहता माणसाच्या साध्या साध्या वागण्याबोलण्यातून, परिचितातून अपरिचित अशा खोल विश्वाचा शोध घेतात. ही माणसे मध्यमवर्गीय उच्च सांस्कृतिक, वातावरणातून आलेली असली तरी ती नियतीपुढं कांहीशी हतबल ठरलेली आहेत. त्यामुळे या कथा कांहीशा गंभीर स्वरूपाच्या वाटतात.

" श्रीशिल्लक " मधील अनुभवविश्व विविधतेने बदलेले आहे. विशेषत: कौटुंबिक अशा अनुभवविश्वातून " श्रीशिल्लक" " धागे " " दि मर्मन ", " दु:ख" या कथा साकार झालेल्या आहेत.

" श्रीशिल्लक " कथेमध्ये धार्मिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर उध्वस्त झालेले कौटुंबिक विश्वच समोर येते. अत्यंत आवडतं असं गुरुचरणी अर्पण करण्यासाठी पत्नीचचं दान करणारा पती, आणि " माझ्या आयुष्यात प्रश्नांना उत्तरंच नाहीत" असं म्हणणारी पत्नी यांच्या भावविश्वाचे अपरिचित अनुभवविश्व या कथेत दिसते, तर " जगात कुणी कुणाचा गुरु होऊ शकत नाही" अशा प्रकारचे निवेदन [illegible] करणारा गुरुही या अनुभवविश्वात दिसतो. चिरमुले यांच्या चिंतनशील अनुभवातून धार्मिक वातावरणातून कौटुंबिक विश्व डोळ्यांसमोर येते. येथे लेखकाची कलात्मकताही दिसते.

" धागे " या कथेचे भावविश्व हे इतर कथांपेक्षा वेगळे आहे, बहुंतेक सगळ्या कथांतून गंभीरतेचा सूर निघतांना दिसतो. तर ही कथा सुखात्म जाणीव करुन देणारी आहे. पती-पत्नीमधील रुसव्या-फुगव्याची भावविश्वता ही कथा फुलवते. आणि वाचकांना एका खेळकर नाटयाचे दर्शन होते. लेखकाच्या अनुभव घेण्याच्या पध्दतीतील ही नवीनता, या कथासंग्रहामध्ये जाणवते.

" दि मर्मन " ही कथा लेखकाच्या जीवनाकडे पहाण्याच्या दोन जीवनदृष्टिकोनातून आकाराला येते. जीवन, जीवनातील रसिकता आणि त्याचा उपभोग यामध्ये या दोन जीवनदृष्टी दिसतात. " देवानं किती किती म्हणून करायला केवढं जग

आपल्यापुढं ठेवलयं " असं म्हणून जीवनाचा प्रचंड रसिकतेने आस्वाद घेऊ इच्छिणारी एक जीवनदृष्टी दिसते, तर यशस्वी आयुष्य जगुनही स्वत:तला " मी " उपरा राहिल्याची जाणीव आयुष्याच्या अखेरीला होते. या अनुभवविश्वातून ही कथा येते.

या कथेतील अनुभवविश्वापेक्षा वेगळे असे अनुभवविश्व " दु:ख " कथेत येते. माणसांच्या आयुष्यात अशा कांही दु:खद घटना घडत असतात , की त्या दु:खाला आपणाच कारणीभूत आहोत असे वाटते. त्यामुळे त्या गोष्टीचा पश्चाताप आणि दु:ख हे माणसाच्या शिव्हारी लागते तो शोकमग्न होतो. या पार्श्वभूमीवर सात्वंनामुळेही माणसाला क्षणाकाल का असेना पण आधार मिळतो असे आनुभवविश्व या कथेत दिसते.

कलावंत मनाचा शोध घेण्याचा दृष्टिकोनातून " आव र्त" कथेचे भावविश्व आपल्या डोळयासमोर येते. कलावेडया मनाने प्रथमपत्नी हयात असलेल्या गायकाशी विवाह केला परंतु कलेतील अलौकिक आनंद आणि व्यवहारातील वासना यांच्यातल द्वंद्व तिच्या मनांत उभ राहातं आणि जीवनाकडे " खरोखरी कशाची कशाला संसगतो असते " येणारा प्रत्येक क्षण नवीनच असतो, याची जाणीव तिला होते. एका भावेवेडया परंतु वास्तवात उध्वस्त झालेल्या मनाची आवर्तनं या अनुभवविश्वातून दिसतात.

वरील सर्व कथांतून कौटुंबिक भावविश्व आपल्यासमोर येते. या अनुभवविश्वातून चिरमुलेयांची अनुभव घेण्याच्या पध्दतीतील संवेदनशीलता दिसून येते, हे अनुभवविश्व भावनि-कतेतून फुलत असतांना लेखकाची अलिप्तताही जाणवते. या सर्वातून चिरमुले यांची कलात्मकताही प्रत्ययाला येते.

" ट्रॅपीझ " कॉलेज तरुणाच्या मनोविश्वाचे प्रत्ययकारी चित्रण या कथेत आहे. या एका विशिष्ट वयात, मनाची अस्थिरता, स्वाप्नाळूपणा आणि व्यवहारातील कटूसत्ये यांची जाणीव होत असते, स्वत:च्या वर्तमाची सुसंगती लागत नाही. तेव्हा ते मनाचे वेगवेगळे धागे दिसू लागतात या वयातील कॉलेज विदयार्थ्यांच्या मनोविश्वाची उकल करण्याच्या दृष्टिको-नातून हे अनुभवविश्व येते. चिरमुले यांच्या अनुभवविश्वात लहानापासून ते वृध्दापर्यंतच्या मनाचा शोध घेतलेला दिसून येतो.

" मारवा " कथेत दोन भावा-भावाच्या वर्तनातील संघर्ष चितारला आहे. व्यवहारी भाऊ जीवनाच्या कर्तव्यपूर्तीचा विचार करणारा, तर दुसरा संगीतातील अलौकिक विश्वात झोकून देवून व्यवहाराच्या पलीकडे गेलेला. व्यवहारातील अलिशान वातावरण आणि संगीतातील अलौकिक जादूभरी दुनिया या पार्श्वभूमीतून ही हे अनुभवविश्व दृगोचर होते.

" पाईक " या कथेचे अनुभवविश्व वरवर पाहता राजकीय पक्षातील युध्दाचे जाणवते परंतु त्यापुढे जाऊन एका भावनाशील मनाचा शोधच इथे घेतलेला आहे. राजकीय पुढा-याचे

अन्याय आणि त्यांनाच मिळालेली बढती तर दुस-या बाजूला त्यांच्या वर्तनामुळे आलेली असहाय्यता दिसते. " करी तो कानपिळी " याचा प्रत्यय या अनुभवविश्वातून एका भावनाशील मनाचा वेधच इथे घेतलेला आहे.

" अनिकेत " ही कथा लहानग्या मुलाच्या भावविश्वातून साकार झालेली आहे. परंतु प्राथमिक स्वरूपात हे भावविश्व लहान मुलांचे असले तरी " नियतीचा माणसांवरील पगडा" च या कथेत दिसतो. माणूस हा येईल त्या परिस्थितीशी संघर्ष करु शकतो परंतु नियतीपुढे मात्र त्याला शरण जावेच लागते. माणसां-माणसांतील संघर्षाबरोबर, माणूस आणि नियती यांच्यातल्या संघर्षाचीच ही कथा आहे. असेच अनुभवविश्व " एकेकाची अखेर " या कथेचे आहे.

" बँकर-ट्रेडर-मॅनेजर - यातील अनुभवविश्व मानसिक बदलावर आधारलेले आहे. एक सरळपणे जगू इच्छिणारे व्यक्तिमत्व आणि दुसरे पैशाच्या अनेक उलाढाली करणारे व्यक्तिमत्व यांच्यातील एका व्यक्तिमत्वाचे दुस-या व्यक्तिमत्वाबद्दल बदलत जाणारे भावविश्व दिसते. उलाढाली करणा-या मित्राच्या वर्तणूकीची " मी " ला वाटणारी तणावयुक्त भीती इथे दिसते. बदलणा-या या मनोवस्थेचे चित्रण कथेत येते.

" बेणं " सध्याच्या उध्वस्त वर्तमानकाळात गतकाळाच्या वैभवशाली जीवनाचे भास होणा-या वृध्द स्त्रीचे भावविश्व या कथेत दिसते. जीवनांत भोगलेले क्षण स्मृतींच्या रूपाने

वारंवार समोर येतात, तर वर्तमानाशी ते विसंगत ठरतात. या भूत-वर्तमानाच्या स्थितीगतीचे भावविश्व या कथेत दिसते.

" युधिष्ठिराचा रथ " राजघराण्यातील वातावरणात इच्छा असून देखील स्वत:ला हवे तसे कलंदर स्वैर जगता येत नाही. याशिवाय वात्सल्याला आचावलेल्या मनांला वाटणारे एकाकीपण यातून निर्माण होणारा संघर्ष या कथेत दिसतो.

" एका स्टेशनमास्तराची गोष्ट " दोन स्त्री-पुरुषांच्या मनांत, मानवी मनातील मूलभूत कामप्रेरणा क्षणभर जागी होते, आणि पुढे वेगळ्याच कृतज्ञशील भावनांनी आपले स्वरूप बदलते. हे अनुभवविश्व अत्यंत तरलतेने, संयमी स्वरूपात या कथेत येते.

काहीवेळा माणसाच्या वर्तनाच्या क्रिया प्रतिक्रिया या वरवरच्या वाटत असल्यातरी त्याचे मूळ मनांत दडलेले असते, याचा शोध चिरमुलेंनी या कथेत घेतलेला आहे. माणसामाणसांच्या नातेसंबंधात मुलभूत प्रेरणा प्रभावी करत असल्या तरी त्या अनाकलनीय वाटतात. याचाही प्रामुख्याने विचार या कथेत केलेला दिसतो.

अशा प्रकारे हे अनुभवविश्व विविधतेने साकारलेले आहे. हे अनुभव कधी संवेदनशीलतेने तर कधी उत्कट स्वरूपात व्यक्त होतात. विशेषत: कुटुंबातील नाते संबंधाचे भावविश्व अधिक तरलतेने येते. पती-पत्नीचे नातेसंबंध हे प्रामुख्याने शारीर पातळीवरचे कसे असतात याचे संयमी विश्व कथाकाराने हाताळले आहे. या अनुभवविश्वात ही नाती आणि त्यांच्या मनातला एकाकी

संघर्षही तरलतेने व्यक्त होतो.

तरुणवयातील मनाला वाटणारी उदास जाणीव त्यातून त्यांच्या सभोवताली पाहाण्याचा दृष्टीकोन आपल्या मन:स्थितीचा स्वत:च्या दृष्टिकोनातून लावलेला अन्वयार्थ यातून परिचितातून अपरिचित असे अनुभवविश्व या कथासंग्रहात दिसते.

माणसाला आयुष्यात नियतीने दिलेले दु:ख भोगावेच लागते. सहन करण्यापलीकडे माणसाच्या हातात कांहीही शिल्लक राहात नाही. अशा दु:खाचा वेधही या अनुभव-विश्वातून साकार होतो.

विशेषत: माणसाच्या मनाचा वेध घेण्याच्या प्रयत्ना-तून हे अनुभवविश्व उभे राहते. त्यामुळे परिचितीतील अपरिचि-तातून उमलणारे भावविश्व उत्कट, तरलतेने टिपले आहे. ते रसिकांच्या अंत:करणास स्पर्श करणारे आहे.

श्री शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांच्या " श्रीशिल्लक " कथासंग्रहातील अनुभवविश्वातून त्यांची अनुभव घेण्याची समृध्दता, विचाराची परिपक्वता जाणवते, एकंदरीत या कथासंग्रहातील अनुभवविश्व हे रसिकांना नवीन जाणवणारे आहे.

# प्रकरण दुसरे

## संदर्भसूची


१. संत जान्हवी — " कादंबरी एक वाङ्मय प्रकार
मोघे प्रकाशन, कोल्हापूर.
प्र. आ. १९७१, पृ. क्र. २७
वरून उद्धृत.

२. प्रा. पाटील गंगाधर — समीक्षेची नवी रूपे
" नवकादंबरी आणि परात्मता"
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
प्र. आ. १९८१. पृ. क्र. ७८

३. कुलकर्णी वा. ल. — " जीवंत रेखीव कथा"
आलोचना, ऑक्टोबर १९६७
पृ. क्र. ३४

४. मिरजकर निशिकांत — " मन सुन्न करणाऱ्या कथा "
माणूस १ जून १९६८.
पृ. क्र. २६

५. कुलकर्णी वा. ल. — उनि, पृ. क्र. ३४

६. तत्रैव — पृ.क्र. ३४, ३५

७. मिरजकर निशिकांत — उनि, पृ.क्र. २६

८. पाध्ये प्रभाकर — आस्वाद, " शरच्चंद्र चिरमुले यांची कथा" मॅजेस्टिक बुक स्टॉल, प्र. आ. १९७१, पृ. क्र. ६२.

| | |
|---|---|
| ९. मिरजकर निशिकांत, | उनि पृ. क्र. २५ |
| १०. नेरुरकर प्रदीप | 'विरोधी जमीनवर आकार घेणाऱ्या चिरमुल्यांचा नव' दैनिक मराठा, रविवार पुरवणी २४ सप्टेंबर १९६७ |
| ११. शेळके शांता ज. | " प्रगल्भ जाणिवेचा पृथगात्म कथाकार " कथाश्री, दिवाळी १९९०.पृ.क्र. ५४. |
| १२. मिरजकर निशिकांत | उनि. पृ. क्र. २६ |
| १३. कुलकर्णी वा. ल. | उनि. पृ. क्र. ४ |
| १४. नेरुरकर प्रदिप | उनि. |
| १५. कुलकर्णी वा.ल. | उनि. पृ. क्र. ३ |
| १६. तत्रैव | पृ. क्र. ३, ४ |
| १७. मिरजकर निशिकांत | पृ. क्र. २६ |
| १८. तत्रैव | पृ. क्र. २६ |
| १९. राजाध्यक्ष विजया | जिव्हार स्वानंदाचे १९६७, सालातील कथा" दिनपुष्प प्रकाशन कृष्णा १२/बी डॉ. भालेराव मार्ग, मुंबई- ४ पृ. क्र. १०२. |
| २०. तत्रैव | पृ. क्र. १०२ |
| २१. कुलकर्णी वा.ल. | उनि. पृ. क्र. ५ |

२२. तत्रैव पृ. क्र. ५

२३. प्रभाकर पाध्ये आस्वाद
-" शरच्चंद्र चिरमुले यांची कथा"
मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.
प्र. आ. १९८९, पृ. क्र. ५८-५९

२४. तत्रैव पृ. क्र. ६९

२५. प्रा. पाटील प्रभाकर महाराष्ट्र टाईम्स
१० मार्च १९६२.

२६. शेळके शांता ज. " प्रगल्भ जाणिवेचा पृथगात्म कथाकार"
कथाश्री, दिवाळी १९९०. पृ क्र. ५५

२७. तत्रैव पृ. क्र. ५६

२८. तत्रैव पृ. क्र. ५६

२९. कुलकर्णी वा. ल. उनि, पृ. क्र. ५

३०. प्रा. कुलकर्णी दा. मराठी कथा: स्वरूप आणि आस्वाद
स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन
पुणे, ३०.
प्र. आ. जून १९७६ पृ. क्र. ९०

३१. प्रा. पाटील गंगाधर " गंगाधर गाडगीळांचे परदेश प्रवास
वर्णन" ललित, ऑगष्ट १९८८
पृ. क्र. ४२

| | | |
|---|---|---|
| ३२. | कुलकर्णी वा. ल. | उनि पृ. क्र. ६ |
| ३३. | तत्रैव | पृ. क्र. ३ |
| ३४. | नेरुरकर प्रदीप | उनि |
| ३५ | पाध्ये प्रभाकर | उनि, पृ. क्र. ६२ |